सेव्हींग व करंट खात्यांवर मिळवा
7% व्याजदर
दि जैन मर्चन्ट्स को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काटेड (संस्थापक) Mo. 9372444001

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
मो. हरी बाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ ॲण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. २५.०४.२०२६ | अंक नं. ०२२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

92.5% शुध्द चांदीमधील अप्रतिम दागिन्यांची असंख्य व्हरायटी
लेडिज अंगठी | फॅन्सी टॉप व रिंगा | लेडिज ब्रासलेट | फॅन्सी गंठन व नेकलेस | कडली | घड्याळ
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
फॅन्सी पायलच्या 3000 पेक्षाही अधिक डिझाईन उपलब्ध

# महिला मोटार वाहन निरीक्षकास धमकावत पकडलेली ट्रक पळविली

## नगर–जामखेड रोडवरील घटना, चौघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर – नगर – जामखेड रस्त्यावर चिचोंडी पाटील परिसरात कर्तव्य बजावत असलेल्या महिला मोटार वाहन निरीक्षकाचे शासकीय वाहन अडवून त्यांना शिवीगाळ व धमकी दिल्याची तसेच त्यांनी जप्त केलेली ओव्हरलोडेड मालट्रक पळवून नेल्याची घटना २४ एप्रिल रोजी दुपारी २ च्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याबद्दल चार जणांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक आयेशा अश्फाक हुसैन (वय ३६, रा. गुलमोहर रोड, अहिल्यानगर) या वायु वेग पथक क्रमांक २ वर कार्यरत असताना ही घटना घडली. त्यांनी ओव्हरलोड असलेल्या एका सहा टायर ट्रकवर कायदेशीर दंडात्मक कारवाई करून तो ताब्यात घेतला होता. सदर वाहन शासकीय कार्यालयात जमा करण्यासाठी घेऊन जात असताना आरोपी संतोष भस्मे (रा.पिंपळा, ता. आष्टी), अजिनाथ बेरड(रा. निंबोडी, ता.नगर), धोंडीराम तुळशीराम निक्रड (रा. मांडवे, ता.नगर) आणि जगताप (पूर्ण नाव माहित नाही)यांनी त्यांच्या पांढऱ्या रंगाच्या क्रेटा कारने निरीक्षक हुसैन यांचे वाहन अडवले.

आरोपींनी हुसैन यांच्या ताब्यातील जप्त केलेले वाहन पळवून नेले आणि त्यांना 'तू नोकरी कशी करते ते बघतो' अशी धमकी देऊन अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. याबाबत निरीक्षक हुसैन यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहिता २०२३ चे कलम १३२,२२१,३५१ (२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार भवार या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# किरकोळ वादातून तरुणावर चाकूने केला प्राणघातक हल्ला

नगर – शहरातील मुकुंदनगर भागात भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या एका तरुणावर आणि त्याच्या भावावर चाकूने प्राणघातक हल्ला केल्याची घटना २३ एप्रिल रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत साहिल मेहमुद देशमुख (वय २२, रा. दुसरी गल्ली, मुकुंदनगर) या तरुणाने फिर्याद दिली आहे. साहिल आणि त्याचा भाऊ मुकुंदनगरमधील मोठी मशीद परिसरात सुरू असलेले भांडण सोडविण्यासाठी गेले होते. त्यावेळी आरोपींनी त्यांना अडवून शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी आरोपी सलीम अनिस शेख आणि जुनेद इनामदार यांनी आपल्याजवळील चाकूने साहिलवर वार केले. या घटनेप्रकरणी पोलिसांनी सलीम अनिस शेख, सना सलीम शेख (दोघे रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) आणि जुनेद इनामदार, राजू इनामदार (दोघे रा. राहुरी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

WALK IN INTERVIEW
Marketing Executive — Post : 2 — MBA / BBA / Graduate
Data Entry Operator — Post : 2 — Graduate
Purchase Executive — Post : 2 — Post Graduate / Graduate
Computer Engineer — Post : 2 — BCA / MCA
Account Assistant — Post : 2 — MBA / M.com / B. com
- Walk in Interview -
Date : 27 & 28 April 2026
Time : 10.00 am to 6.00 pm, Apply with full Bio-data
Success Electronics Pvt. Ltd.
M. 9552521189
1267, Pratibha, Dalmandai, Ahmednagar.

# शहरातील गायत्री मंदिरातून भरदिवसा दागिन्यांची चोरी

नगर – शहरातील गजबजलेल्या महाजन गल्ली भागातील गायत्री मंदिर हॉलमध्ये एका घरगुती कार्यक्रमादरम्यान अज्ञात चोरट्याने ७२ वर्षीय महिलेचे सुमारे ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले आहेत. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अंजली अशोक देशमुख (रा. पुणे) यांनी २४ एप्रिल रोजी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या १९ एप्रिल रोजी दुपारी नगरमधील गायत्री मंदिर हॉल येथे एका कार्यक्रमासाठी आल्या होत्या. दुपारी ३ ते ५ वाजेच्या सुमारास त्या हॉलमध्ये असताना, कोणीतरी अज्ञात चोरट्याने संधी साधून त्यांच्या कानातील ४० हजार ३१० रुपये किमतीची ५ ग्रॅम वजनाची सोन्याची कर्णफुले चोरून नेली.

दागिने चोरीला गेल्याचे लक्षात येताच देशमुख यांनी परिसरात शोध घेतला, मात्र चोरट्याचा पत्ता लागला नाही. अखेर त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) नुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रदीप बडे करत आहेत.



## कोठला स्टँड येथील प्रवासी बस थांबा निवारा कोसळला

शहरातील छत्रपती संभाजीनगर ते पुणे राष्ट्रीय महामार्गावरील कोठला स्टँड येथील प्रवासी बस थांबा निवारा कोसळला आहे.सदर बस थांबा प्रवाशांसाठी ऊन,वारा,पाऊस या साठी उभारलेला होता परंतु तेथील घाण व दुर्गंधीमुळे कोणी या प्रवासी निवारा स्टँड मध्ये थांबत नव्हते. तरी या ठिकाणी अत्याधुनिक प्रवासी निवारा उभा करावा अशी मागणी होत आहे. (छाया–महावीर पोखरणा)

३०० स्के.फू. रोडटच दुकान भाड्याने देणे
नवीपेठ मध्ये, नवीन मराठी शाळे समोर, रोडटच दुकान भाडयाने देणे
7350012310

दर्जेदार फ्लेक्स प्रिंटींग
9403232323

होम सर्व्हिस मसाज व रुग्णसेवा
केरळा, प्रोफेशनल आयुर्वेदिक पध्दतीने घरी येऊन फुलबॉडी मसाज करून मिळेल.
तसेच बेडवर असलेल्या रुग्णांना घरी येऊन केअर केले जाईल.
टीप : पॅरेलिसेस मसाज केल्याने बरा होतो.
Full Body Massage मंथली बेसेसवर सुध्दा उपलब्ध
9850127508 / Mo.8830275190

# शहरात तीव्र पाणीटंचाईने नागरिक हैराण

## महापालिका प्रशासनाने टँकरद्वारे तातडीने पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी

नगर – शहरातील कायनेटिक चौक परिसरात सध्या तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून, नागरिकांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. उन्हाळ्याची तीव्रता वाढत असतानाच महापालिकेकडून होणारा पाणीपुरवठा विस्कळीत आणि कमी दाबाने होत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

कायनेटिक चौक परिसरातील विविध उपनगरांमध्ये गेल्या काही दिवसांपासून पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक कोलमडले आहे. नळाला पाणी आले तरी त्याचा दाब अत्यंत कमी असतो, ज्यामुळे दैनंदिन गरजा भागवणे कठीण झाले आहे. विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याने परिसरात नाराजीचे वातावरण आहे.

या प्रश्नावर नगरसेवक मनोज कोतकर यांनी स्थायी समितीच्या बैठकीत मुद्दा उपस्थित करत तातडीच्या उपाययोजनांची मागणी केली. त्यांनी स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे तसेच महापालिका प्रशासनाकडे या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे आवाहन केले.

नगरसेवक मनोज कोतकर म्हणाले, कायनेटिक चौक परिसरातील नागरिकांना सध्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नळाद्वारे पाणीपुरवठा नियमित आणि पुरेशा दाबाने होत नसल्यामुळे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा. दरवर्षी उन्हाळ्यात शहरात पाणीटंचाईची समस्या निर्माण होणे ही गंभीर बाब आहे. प्रशासनाने केवळ तात्पुरते उपाय न करता दीर्घकालीन आणि कायमस्वरूपी नियोजन करणे आवश्यक आहे.

कायनेटिक चौक परिसरात विशेषतः महिलां व ज्येष्ठ नागरिकांना पाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत असून, तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

महापालिका प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून पाणीपुरवठा सुरळीत व पुरेशा दाबाने करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही बैठकीत करण्यात आली.

# छावणी परिषदेच्या कर्मचाऱ्यावर लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला

नगर – रात्रीच्या वेळी गल्लीतून फिरण्यास विरोध करत एका इसमाने सरकारी कर्मचाऱ्याच्या डोक्यात लोखंडी रॉडने प्रहार करून गंभीर जखमी केल्याची घटना सिव्हील हडको परिसरात घडली. या हल्ल्यात सुहास बाळासाहेब जगताप (वय ४०) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

सुहास जगताप हे छावणी परिषदेत सरकारी नोकरीस असून ते कुटुंबासह सावेडी येथील सिव्हील हडको भागात राहतात. २२ एप्रिल रोजी रात्री जेवण झाल्यावर ते समता चौकातून पायी फिरण्यासाठी गेले होते. रात्री ११ च्या सुमारास त्यांच्याच गल्लीत राहणारा आरोपी लाभेश जवाहरलाल जंगेडिया याने जगताप यांना अडवले. आमच्या घरासमोरून आणि गल्लीतून फिरायचे नाही, असे म्हणत त्याने वाद घातला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि लाभेशने हातातील लोखंडी रॉडने जगताप यांच्या डोक्यात जोरात वार केला.

हल्ल्यात जगताप यांच्या कपाळावर गंभीर जखम होऊन रक्तस्राव झाला, तसेच हातालाही दुखापत झाली. आरडाओरडा ऐकून जगताप यांचे कुटुंबीय मदतीला धावले. जखमी अवस्थेत त्यांना प्रथम तोफखाना पोलीस ठाण्यात नेण्यात आले, तेथून वैद्यकीय मेमो घेऊन खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. जगताप यांच्या डोक्याला दोन ठिकाणी टाके पडले आहेत. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी लाभेश जंगेडिया विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार चांगदेव आंधळे करत आहेत.

कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
रत्नकमल चहा
10 किलो मागे 1 मोठी पिशवी फ्री..फ्री..
ब्रँडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा एक वेळेस जरुर तुलना करून पहा
आशिष ट्रेडर्स
Contact : 8767369367
इतर कंपन्या पेक्षा 50 ते 70 रुपये कमी किलो मागे स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम.

महेंद्र पेडावाला
रजवाडी गुजराती थाळी
पार्सल सुविधा उपलब्ध..
दर रविवारी दालबाटी स्पे. आमरस
किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय..
कापड बाजार, अहिल्यानगर.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# शिंदे सेनेच्या संजय गायकवाडची आमदारकी रद्द करा

## भाकपची मागणी, पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर 'शिवाजी कोण होता?' पुस्तकाचे सामुदायिक वाचन



शिवाजी महाराजांचा अपमान प्रकरणी संजय गायकवाड यांची आमदारकी रद्द करावी अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्यावतीने करण्यात आली.

नगर - शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे आमदार संजय गायकवाड यांनी शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या संदर्भात आक्षेपार्ह, अश्लील वक्तव्य करुन प्रशांत आंबी यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या आरोपावरून त्यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी तसेच त्यांचा आमदारकीचा राजीनामा घेण्यात यावा, अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भातील निवेदन डिवायएसपी दिलीप टिपरसे यांना देण्यात आले असून, त्यांच्या मार्फत गृहमंत्री तसेच मुख्यमंत्री यांनाही निवेदन पाठविण्यात आले आहे. तसेच या संदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन त्यांना शिवाजी कोण होता? या पुस्तकाची भेट देण्यात आली. यावेळी पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या पुस्तकाचे सामुदायिक वाचन करून गायकवाड यांचा निषेध व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनात राज्य सेक्रेटरी कॉ. ॲड. सुभाष लांडे, ॲड. सुधीर टोकेकर, इंजि. प्रशांत पाटिल, संध्या मेढे, भैरवनाथ वाकळे, भारती न्यालपेल्ली, संगीता कोंडा, संजय वाघ, कॉ. फिरोज शेख, संजय झिंजे, अशोक सुर्यवंशी, कॉ. सुभाष कडलग, सुदाम लगड, विनायक गोरखे, राजु वैराळ, अनिल भोसले (भाकप माले राज्य सदस्य), प्रा. डॉ. महेबुब सय्यद, सोमनाथ केंजळे, युनुस तांबटकर, प्रविण सोनवणे, ॲड. विद्या जाधव, दुर्गेश भोसले, आर्कि. अर्शद शेख, कॉ. अविनाश साठे, बापु चंदनशिवे, राजेंद्र कर्डिले, श्याम शिंदे, दिपक शिरसाठ, बापूराव राशिनकर, संदीप इथापे आदी उपस्थित होते.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, आमदार संजय गायकवाड यांनी २२ एप्रिल रोजी रात्री १२.५२ वाजता ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनचे माजी राज्य सेक्रेटरी प्रशांत आंबी यांना फोनवरून जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या संदर्भात अत्यंत अश्लील व आक्षेपार्ह भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही बाब लोकशाही मूल्ये व अभिव्यक्ती स्वातंत्र्याला बाधा आणणारी असल्याचे भाकपने स्पष्ट केले आहे.

यासोबतच छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल त्यांनी अवमानकारक वक्तव्य करून महाराष्ट्राच्या श्रद्धास्थानाचा अपमान केल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे. आमदार गायकवाड यांचे वर्तन हे आमदार पदाला शोभणारे नसून राज्याच्या राजकीय संस्कृतीला कलंक लावणारे असल्याची टीका करण्यात आली. शिवाजी कोण होता? हे पुस्तक इतिहासाचा चिकित्सक व अभ्यासपूर्ण दृष्टिकोन मांडणारे असल्याचे नमूद करण्यात आले आहे. समाजात वैज्ञानिक दृष्टी, समता आणि ऐतिहासिक सत्य जाणून घेण्याची प्रेरणा देणारे हे महत्त्वपूर्ण लेखन असल्याचे सांगण्यात आले. तसेच प्रबोधनकार ठाकरे यांनी १९२६ मध्ये दगलबाज शिवाजी हे पुस्तक लिहिले होते, तर गणेश कुन्हाडे यांनी १९३९ मध्ये शिवाजी कोण होता? हे पुस्तक लिहिल्याचा उल्लेखही करण्यात आला.

आमदार संजय गायकवाड यांचा तात्काळ राजीनामा घेण्यात यावा, जीवे मारण्याची धमकी, जातींमध्ये तेढ निर्माण करणे, महापुरुषांचा अपमान व महिलांविषयी अश्लील वक्तव्य या गंभीर गुन्ह्यांखाली गुन्हा दाखल करून तातडीने अटक करण्यात यावी, गोविंद पानसरे खून प्रकरणात आमदार गायकवाड यांची सखोल चौकशी करण्यात यावी, नगरमधील नगरसेवक श्रीपाद छिंदम प्रकरणाप्रमाणेच न्याय देत गायकवाड यांची आमदारकी रद्द करण्यात यावी आणि त्यांच्या सर्व अनधिकृत धंद्यांवर बंदी घालण्याची मागणी भाकपच्या वतीने करण्यात आली आहे.

लोकशाही व्यवस्थेत विचार मांडण्याचे स्वातंत्र्य अबाधित राखणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे नमूद करत, अशा प्रकारच्या धमक्या व बेकायदेशीर कृत्यांना आळा घालण्यासाठी तातडीने कठोर कारवाई करावी, अन्यथा भारतीय कम्युनिस्ट पक्ष व पुरोगामी संघटनांच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# दिसत नसलेली प्रगती : गुंतवणुकीतील सर्वात महत्त्वाचा टप्पा



राजन कुटे

बाजार केवळ आपल्या गुंतवणुकीचीच नाही, तर आपल्या संयमाचीही परीक्षा घेतो. काही काळ सर्व काही सुरळीत चालल्यासारखं वाटतं, तर काही वेळा प्रगती संथ, अनिश्चित किंवा अगदी अस्वस्थ करणारी वाटते. अशा शांत आणि कमी परिणाम दिसणाऱ्या काळातच गुंतवणुकीचा खरा स्वभाव समोर येतो. बहुतेक गुंतवणूकदार सुरुवात करताना स्पष्ट उद्दिष्ट ठेवतात. एक दिशा असते, एक कालावधी ठरलेला असतो, आणि त्यात टिकून राहण्याची तयारीही असते. पण बाजारातील चढ उतारांमुळे ही स्पष्टता अनेकदा शंकेत बदलते. मी योग्य मार्गावर आहे का? या प्रश्नाची जागा मला काही वेगळं करायला हवं का? हा प्रश्न घेतो. हा बदल सूक्ष्म असतो, पण महत्त्वाचा असतो. गुंतवणुकीत प्रगती नेहमी वाढीसारखी दिसत नाही. काही काळ असा असतो की काहीच घडत नाही असं वाटतं. परतावे कमी वाटतात, पोर्टफोलिओ स्थिर दिसतो, आणि प्रत्येक दिवसासोबत काहीतरी करण्याची इच्छा वाढत जाते. अशा वेळी हा काळ प्रगती नसल्याचा भास होतो. पण प्रत्यक्षात, याच काळात शिस्त घडत असते. प्रत्येक चांगल्या प्रकारे रचलेल्या गुंतवणूक योजनेत हे गृहीत धरलेलं असतं की बाजार लगेच संयमाचं फळ देणार नाही. काही काळ असा येतो की गुंतवणूक सुरू ठेवणं कठीण, कधी कधी अनावश्यक वाटू शकतं. पण अशा काळात टिकून राहण्याची क्षमता हीच दीर्घकालीन परिणाम घडवते. अनेकदा गुंतवणूकदारांना खात्रीसाठी आकड्यांचा आधार घ्यावासा वाटतो- परतावे, क्रमवारी, तुलना. यांचा उपयोग असला तरी अनिश्चिततेच्या काळात ते मनाला फारसा आधार देत नाहीत. खरी स्थिरता येते ती एका वेगळ्याच गोष्टीतून-रचना योग्य आहे याची खात्री आणि त्यावर विश्वास ठेवण्याची तयारी. हेही लक्षात ठेवायला हवं की प्रत्येक टप्प्यावर कृती करणे आवश्यक नसते. उलट, अनेक वेळा महत्त्वाचे परिणाम हे वारंवार निर्णय घेण्यातून नव्हे, तर अनावश्यक निर्णय टाळण्यातून येतात. याचा अर्थ गुंतवणुकीकडे दुर्लक्ष करणे नाही, तर त्याकडे स्पष्टतेने पाहणे आणि घाईघाईने प्रतिक्रिया न देणे. तात्पुरती अस्वस्थता ही योजना सोडण्याचा संकेत नसून तिच्या प्रवासाचा एक भाग असते, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. काळाच्या ओघात बाजार स्थिर राहणाऱ्यांना अधिक बक्षीस देतो, सक्रिय राहणाऱ्यां पेक्षा. हा फरक अल्पावधीत दिसत नाही, पण दीर्घकाळात तो महत्त्वाचा ठरतो. शेवटी संपत्ती ही केवळ संधींमधून तयार होत नाही; ती तयार होते त्या शांत शिस्तीतून, जी आपल्याला सोडून देणं सोपं असताना देखील टिकून राहायला मदत करते.

- **राजन कुटे**, अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

# पानमसाला व सुगंधी तंबाखू विक्रेत्यावर अन्न व औषध प्रशासना विभागाचा छापा

नगर - राज्यात विक्रीस बंदी असलेला सुगंधी पानमसाला, तंबाखू आणि आरोग्यास घातक असलेला मावा विक्री करणाऱ्यांविरोधात अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने मोठी कारवाई केली आहे. बोल्हेगाव परिसरातील गांधीनगर येथील एका जनरल स्टोअर्सवर छापा टाकून हजारो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून एका तरुणावर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी किरण धन्यकुमार जगदाळे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अझहर फारुख पठाण (वय २२, रा. सरकार चौक, गांधीनगर, बोल्हेगाव) याच्यावर भारतीय न्याय संहिता आणि अन्न सुरक्षा मानके अधिनियमातील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोल्हेगाव येथील सरकार चौकात असलेल्या इम्रान जनरल स्टोअर्समध्ये मानवी शरीरास अपायकारक असलेल्या पदार्थांची विक्री होत असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे २४ एप्रिल रोजी सकाळी ९.३० च्या सुमारास छापा टाकला. या कारवाईत ६ हजार ६०० रुपये किमतीचे विमल पानमसाल्याचे २४ पाकीट, सुगंधित तंबाखूचे २४ पाकीट आणि १० किलो वजनाचा मावा असा एकूण १३ हजार १२८ रुपयांचा माल जप्त केला.

हा सर्व साठा मानवी आरोग्यास धोकादायक असल्याचे माहिती असूनही आरोपीने केवळ विक्रीच्या उद्देशाने आपल्या दुकानात बाळगल्याचे तपासात समोर आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक परशुराम दळवी करत आहेत.

# शिर्डी येथे २६ एप्रिलला भरणार महसूलमंत्र्यांचा जनता दरबार

नगर - नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचे थेट निराकरण करण्यासाठी शिर्डी येथे राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत नागरिक निवेदन स्वीकृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २६ एप्रिल रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत शिर्डी येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात हा उपक्रम पार पडणार आहे.

यावेळी नागरिकांच्या विविध समस्या तसेच मागण्यांबाबत लेखी निवेदने सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या माध्यमातून महसूल, जमीन, पाणी, शासकीय सेवा आणि इतर प्रशासकीय विषयांशी संबंधित तक्रारी व मागण्या थेट मंत्रीस्तरावर मांडता येणार आहेत. नागरिकांनी आपली निवेदने लेखी स्वरूपात सादर करावीत, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# सारसनगरमध्ये तरुणीचा विनयभंग

नगर - शहरातील सारसनगर परिसरातील संत भगवानबाबा नगर येथे दारूच्या नशेत एका तरुणाने भररस्त्यात गोंधळ घालत एका २० वर्षीय तरुणीचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ एप्रिल रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास आरोपी नागेश अशोक बडे (रा.संत भगवानबाबा नगर, सारसनगर) हा दारूच्या नशेत परिसरात शिवीगाळ करत होता. यावेळी पीडित तरुणीने त्यास शिवीगाळ करण्याबाबत जाब विचारला. याचा राग मनात धरून आरोपीने तिच्याशी अत्यंत असभ्य वर्तन करून तिचा विनयभंग केला.

# जोगीसिंह मिनहास यांचे अल्प आजाराने निधन



नगर - अ.नगर डिस्ट्रीक्ट फुटबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष जोगीसिंह जमीयतसिंग मिनहास (वय ८२) यांचे २४ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# सुरजबाई गांधी यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीगोंदा - कासारगल्ली येथील रहिवासी श्रीमती सुरजबाई शंकरलाल गांधी (आढळगाववाला, वय १०२) यांचे २५ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर श्रीगोंदा अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, सुना, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्रीगोंदा साखर कारखान्याचे माजी संचालक सुभाषलाल गांधी यांच्या त्या मातोश्री तर सुरेंद्र, सचिन, सुजित यांच्या आजी होत.

# मनसुखलाल भंडारी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - आडतेबाजार अहिल्यानगर येथील रहिवासी मनसुखलाल रुपचंद भंडारी (वय ७८) यांचे २५ एप्रिल रोजी सकाळी ६ वा. अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ मुली, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. गौतम, प्रितम भंडारी, मेघा मुनोत, हर्षा शिंगवी यांचे ते वडील होत.

# लिंबाजी पंगुडवाले यांचे दु:खद निधन



नगर - हातमपूरा येथील रहिवासी लिंबाजी बाबुराव पंगुडवाले (वय ८१) यांचे २४ एप्रिल रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्यावर लालटकी येथील लिंगायत गवळी समाजाच्या स्मशानभूमीत दफनविधी करण्यात आला.

त्यांच्या मागे २ मुले, ५ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. स्व. अंबादास पंगुडवाले यांचे ते बंधू होत.

# रुग्णालयातील बाथरुममध्ये नर्सने केली आत्महत्या



जामखेड - शहरातील बसस्थानक परिसरात असलेल्या एका खासगी रुग्णालयातील बाथरूममध्येच शबनम दस्तगीर सय्यद (वय २९) या नर्सने आत्महत्या केली. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.

मयत शबनम यांचे वडील दस्तगीर सय्यद (वय ५५, रा. पोकळे वस्ती, जामखेड) यांनी पोलिसांत दिलेल्या माहितीनुसार, शबनम या नेहमीप्रमाणे २३ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता रुग्णालयात गेल्या होत्या. साडेदहा वाजेच्या सुमारास त्या बाथरूममध्ये गेल्या, मात्र बराच वेळ होऊनही त्या बाहेर न आल्याने रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला. यावेळी शबनम या बेशुद्धावस्थेत आढळून आल्या. डॉक्टरांनी तपासणी केली असता त्यांचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. शबनम या विवाहित असून त्यांना ५ आणि ६ वर्षांची दोन मुले आहेत. पतीसोबत घटस्फोट झाल्याने त्या गेल्या काही वर्षांपासून माहेरी वडिलांकडेच राहत होत्या. माहेरचा आधार आणि मुलांचे भविष्य घडवण्यासाठी त्या नर्स म्हणून काम करत होत्या. त्यांच्या या टोकाच्या पावलामुळे दोन चिमुरड्यांचे मातृछत्र हरपल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मयत शबनम यांच्या हातावर इंजेक्शन टोचल्याची खूण आढळून आली आहे. त्यांनी नेमके कोणते औषध शरीरात टोचून घेतले, हे शोधण्यासाठी त्यांचा व्हिसेरा राखून ठेवण्यात आला आहे. तो तपासणीसाठी नाशिक येथील प्रयोगशाळेत पाठवला आहे. त्याचा अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, असे वैद्यकीय अधिकारी डॉ. कुंडलिक अवसरे यांनी सांगितले.

# शहर विधानसभा मतदार यादीतील बोगस नावे काढा

## मतदार यादी पुनरावलोकन मोहिमेतील त्रुटी तात्काळ दूर करण्याची शिवसेनेची मागणी



निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे. समवेत संजय झिंजे, मनोज गुंदेचा, विलास उबाळे, अनिस चुडीवाला, रावजी नांगरे, दीपक भोसले, राम वाणी आदी.

नगर - शहर विधानसभा मतदारसंघात सुरू असलेल्या मतदार यादी पुनरावलोकन मोहिमेच्या (एसआयआर) अंमलबजावणीत गंभीर त्रुटी आहेत. मतदार यादी अद्ययावत करण्याचे उद्दिष्ट असले तरी प्रत्यक्षात अनेक अनियमितता होत असल्याचा गंभीर आरोप ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे. तसेच शहर विधानसभा मतदार संघाच्या यादीतील तसेच श्रीगोंदा - नगर आणि राहुरी - नगर - पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील बोगस नावे वगळण्याची मागणी काळे यांनी केली आहे.

काळे यांनी याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. यावेळी संजय झिंजे, मनोज गुंदेचा, विलास उबाळे, अनिस चुडीवाला, रावजी नांगरे, दीपक भोसले, राम वाणी, राम झिने, चंद्रकांत उजागरे, संजय कांबळे, राम धोत्रे, उषा भगत, शारदा वाघमारे, मीना रणशूर, विकास भिंगारदिवे, किशोर कोतकर, शंकर आव्हाड, विनोद शिरसाट, माजी नगरसेवक फैयाज शेख, हाफिज सय्यद, धनंजय देशमुख, गणेश आपरे, आकाश आल्हाट उपस्थित होते.

किरण काळे म्हणाले, घरपोच पडताळणी प्रक्रिया अपूर्ण असून अनेक ठिकाणी प्रत्यक्ष भेट न देता नावांची पडताळणी केल्याचे दाखवले जात आहे. त्यामुळे बोगस नावे कायम राहण्याची आणि खऱ्या मतदारांची नावे वगळली जाण्याची शक्यता आहे. याशिवाय, डेटा एन्ट्री दरम्यान नाव, वय व पत्त्यात मोठ्या प्रमाणात चुका होत आहेत. अभियानाबाबत जनजागृतीचा अभाव ही देखील गंभीर बाब आहे. अनेक मतदारांना या प्रक्रियेची माहितीच नाही. तसेच नागरिकांनी दिलेल्या तक्रारींवर वेळेत निर्णय होत नसल्याने पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह आहे. कर्मचाऱ्यांवर दुहेरी जबाबदाऱ्या टाकल्यामुळे कामाचा ताण वाढून अंमलबजावणीवर परिणाम होत आहे. स्थलांतरित कामगार व भाडेकरू मतदारांच्या नोंदीत विसंगती दिसून येत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या सर्व त्रुटी तात्काळ दूर करून पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने एसआयआर अभियान राबवावे, अशी मागणी शिष्टमंडळाच्या वतीने करण्यात आली आहे.

# 'निरंकारी मिशन'च्या शिबिरात १७५ जणांनी केले रक्तदान

## मानव एकता दिनानिमित्त शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; महिलांचा मोठा सहभाग





संत निरंकारी मिशनच्यावतीने आयोजित शिबिरात रक्तदान करताना महिला व पुरुष रक्तदाते.

नगर - हृदयात करुणा, प्रेम आणि एकात्मतेची दिव्य जाणीव जागृत झाली की, मनुष्य स्वार्थाच्या पलीकडे जाऊन सृष्टीच्या कल्याणाचे माध्यम बनतो. हाच उदात्त संदेश देत मानव एकता दिनानिमित्त संत निरंकारी मिशनच्या अहिल्यानगर शाखेतर्फे आयोजित रक्तदान शिबिरात १७५ दात्यांनी रक्तदान केले. यामध्ये महिलांचा सहभाग लक्षणीय होता.

युगप्रवर्तक बाबा गुरबचन सिंहजी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी २४ एप्रिल हा दिवस जगभरात मानव एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. यावर्षी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिताजी यांच्या सान्निध्यात दिल्लीसह देशभरातील हजारो केंद्रांवर हा दिवस श्रद्धा व समर्पण भावाने साजरा करण्यात आला.

नगरमधील स्थानिक शाखेत आयोजित या शिबिराचे उद्घाटन डॉ. प्रफुल्ल चौधरी व डॉ. कैलास झालानी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी झोनल इन्चार्ज हरीश खुबचंदानी, आनंद कृष्णानी, विठ्ठल खाडे आदी उपस्थित होते. जिल्हा रुग्णालय रक्तपेढीतील अनुभवी डॉक्टर व त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तदात्यांची आरोग्य तपासणी करून रक्त संकलनाची प्रक्रिया पार पाडली. विशेष म्हणजे अनेक तरुणांनी पहिल्यांदाच रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जपली.

युगप्रवर्तक बाबा गुरबचन सिंह जी यांनी सत्य, साधेपणा आणि सद्भावनेचा मार्ग दाखवत तरुणांना नशामुक्त जीवनाचा अवलंब करण्याचे आवाहन केले होते. तोच वारसा पुढे नेत आजचे शिबिर अत्यंत शिस्तबद्ध आणि सेवाभावी वातावरणात पार पडले.

### देशभरात ४० हजार युनिटचे संकलन

संत निरंकारी मंडळाचे सचिव जोगिंदर सुखीजा यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी देशभरातील सुमारे २०० हून अधिक ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. यातून जवळपास ४०,००० युनिट रक्त संकलित करण्यात आले. बाबा हरदेव सिंह जी यांनी दिलेला रक्त नाड्यांतून वाहावे, नाल्यांतून नव्हे हा संदेश सार्थ ठरवत ही सेवा चळवळ आजही अविरत सुरू आहे.

### चार दशकांची पावन परंपरा

गेल्या चार दशकांपासून निरंकारी मिशनतर्फे रक्तदानाची ही परंपरा अखंड सुरू आहे. आतापर्यंत ९,१७४ शिबिरांच्या माध्यमातून सुमारे १५,००,२३० युनिट रक्त संकलित करण्यात आले असून, मानवसेवेप्रती असलेली मिशनची बांधिलकी यामुळे अधोरेखित झाली आहे. यावर्षी देशभरात एकूण ७०५ ठिकाणी शिबिरे आयोजित करण्याचा संकल्प मिशनने सोडला आहे. मिशनच्या या उपक्रमामुळे अनेकांना जीवदान मिळालेले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### वाढत्या वयात राहाल तरुण

आपल्या शरीराप्रमाणेच, आपला मेंदू देखील वयानुसार मंदावू लागतो. परंतु जर योग्य जीवनशैलीचा अवलंब केला, तर मेंदू दीर्घकाळ तल्लख, सक्रिय आणि तरुण ठेवता येतो. आपण अनेकदा विसरतो की मेंदू देखील एका 'स्नायू'सारखा आहे, ज्याला दररोज व्यायाम, योग्य पोषण आणि सकारात्मक सवयींची गरज असते. व्यायामामुळे केवळ शरीरच नाही, तर मेंदूही सक्रिय राहतो. दररोज ३० मिनिटे चालल्याने किंवा योगा केल्याने मेंदूतील रक्ताभिसरण सुधारते, ज्यामुळे मेंदूला पुरेसा ऑक्सिजन आणि पोषक तत्वे मिळतात. यामुळे चेतापेशी (न्यूरॉन्स) सक्रिय राहतात आणि मेंदूची वृद्धत्वाची प्रक्रिया मंदावते. मेंदूला नेहमी काहीतरी नवीन करण्याची गरज असते. नवीन भाषा शिकणे, एखादे वाद्य वाजवणे किंवा नवीन कौशल्ये आत्मसात करणे हा तुमचा मेंदू तीक्ष्ण करण्याचा एक उत्तम मार्ग आहे. यामुळे चेतासंस्थेतील जोडण्या मजबूत होतात आणि मेंदूच्या पेशींना चालना मिळते. मित्र आणि कुटुंबीयांशी बोलणे आणि समाजात सक्रिय राहणे हे मानसिक आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. सामाजिक संवादामुळे तणाव कमी होतो आणि भावनिक संतुलन राखले जाते, ज्यामुळे मेंदू निरोगी राहण्यास मदत होते.

## पाककला

### ओल्या नारळाच्या वड्या

**साहित्य** – ओला नारळ: २ वाट्या (खोवून घेतलेला पांढरा शुभ्र चव), साखर: १ ते सव्वा वाटी (तुमच्या आवडीनुसार), दूध: अर्धी वाटी साय किंवा मलई २ मोठे चमचे (वड्या मऊ होण्यासाठी), साजूक तूप: १ मोठा चमचा, केशर: ७-८ काड्या (२ चमचे कोमट दुधात भिजवलेल्या), वेलची पूड: अर्धा छोटा चमचा

**कृती** : एका जाड बुडाच्या कढईत ओला नारळ, साखर आणि दूध एकत्र करा. मंद आचेवर हे मिश्रण सतत ढवळत राहा. साखर विरघळली की मिश्रण थोडे पातळ होईल. मिश्रण थोडे आटत आले की त्यात दूध-मलई आणि साजूक तूप घाला. यामुळे वड्यांना छान चकाकी आणि मऊपणा येतो. आता यात दुधात भिजवलेले केशर घाला. केशरमुळे वड्यांना सुंदर पिवळसर रंग आणि एक वेगळाच स्वाद येतो. मिश्रण कढई सोडू लागले की त्यात वेलची पूड टाकून नीट मिक्स करा. एका ताटाला तुपाचा हात लावून घ्या. तयार मिश्रण ताटात काढून एकसारखे थापा. मिश्रण थोडे कोमट असतानाच चाकूने वड्या पाडून घ्या. वरून हवे असल्यास बदामाचे काप लावून सजवा. वड्या पूर्णपणे गार झाल्यावर ताटातून काढून सर्व्ह करा.

## वास्तू

### दक्षिण दिशेसंबंधी...

✻ दक्षिण दिशा अग्नी तत्वाशी संबंधित आहे. येथे चुकीच्या रंगांचा वापर केल्यास जीवनातील संघर्ष वाढू शकतो. या दिशेत लाल, नारंगी किंवा गुलाबी रंगांचा वापर शुभ मानला जातो.

✻ निळा किंवा काळा रंग वापरणे टाळावे, अग्नी व पाण्याच्या संयोगामुळे वाद होऊ शकतात.

## सौंदर्य

चारकोल फेस मास्क त्वचेचा टोन सुधारतो. मृत त्वचेच्या पेशी काढून टाकते आणि एक चमक आणि स्वच्छ पोत देते.

## सल्ला

पावसाळी दमट हवेत खोबरे गोटा तसाच न ठेवता त्याच्या दोन वाट्या करून उडीद डाळीत ठेवाव्यात, म्हणजे त्यांना बुरशी न लागता त्या चांगल्या राहातात.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

# दैनिक पंचांग

रविवार, दि. २६ एप्रिल २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, वैशाख शुक्लपक्ष, मघा २०।२७, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : पैसा खर्च होईल. संतती बरोबर मतभेद किंवा त्यांच्या चिंतेत मन व्यग्र राहील. सामाजिक कार्यात आघाडी घ्याल.

**वृषभ** : नवीन कामाची सुरूवात करण्याला अनुकूल दिवस. मित्रांबरोबर दिवस आनंदात घालवाल. मागील देणी वसुल होतील.

**मिथुन** : विद्यार्थ्यांना आज अभ्यासात रस वाटणार नाही. शेअर्समध्ये गुंतवणूक करू शकाल. आध्यात्मिकतेतून शांती मिळेल.

**कर्क** : मित्र आणि कुटुंबीय यांच्याबरोबर आनंदात दिवस घालवाल. प्रवास, सहली यातूनही आज आनंद मिळवू शकता.

**सिंह** : आध्यात्मिकतेच्या मदतीने विचारातील नकारात्मकता दूर कराल. मनाच्या एकाग्रतेमुळे सर्व कामात फायदा होईल.

**कन्या** : स्वकीयांचा वियोग घडू शकतो. कुटुंबातील लोकांशी मतभेद संभवतात. मिळणाऱ्या मोठे व्यावसायिक नुकसान होणयाची शक्यता आहे.

**तूळ** : देण्या-घेण्याचे निर्णय विचारपूर्वक घ्या. अपघात व गैरसमज यापासून दूरच राहा. वाहने सावकाश चोरीला जातील.

**वृश्चिक** : शारीरिकस्वास्थ्य बिघडू शकते. विनाकारण खर्च होईल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.


**धनु** : आज अध्यात्माकडे कल राहिल. जुने मित्र व नातेवाईक यांच्या सहवासामुळे दिवस आनंदात व्यतीत होईल.

**मकर** : उतावीळ स्वभावावर नियंत्रण ठेवून कार्ये शांततेत केल्यास आजचा दिवस हा यशदायी ठरेल. उधारी वसुल होईल.

**कुंभ** : हितशत्रूंपासून पिडा संभवते. संततीसौख्य लाभेल. कोर्ट-कचेरी आदी गोष्टींपासून लांब रहा.

**मीन** : आर्थिक व्यवहार करताना अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. तब्येत सांभाळा.

## शब्दगंध क्र. ७४१७ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७४१६ चे उत्तर



**आडवे शब्द** :- १) एक म्हण - ++++ +++ गाय शहाणी ७) कागद एकमेकांना जोडणारी नेडे नसलेली सुई ८) कोणत्याही ऋतूतील हवामान सहन करू शकणाऱ्या शरीरयष्टीचा ९) पुष्कळ; जास्त; रगड ११) काव्य; कविता १३) वाताहत; बोजवारा १६) एक हजार किलो किंवा दहा क्विंटल वजनाचे माप १७) समेट; साम; सलोखा १८) आकांक्षा; इच्छा; मनीषा १९) आण्याचा बारावा अंश; एक मराठी आडनाव २०) नृप; भूपती; राणीचा नवरा २२) संरक्षणासाठी रात्री केला जाणारा फिरता पहारा २३) देवांचे शत्रू; राक्षस २४) लाट; तरंग; हुक्की २५) मत्सर; द्वेष; आकस

**उभे शब्द** :- १) भाग; हिस्सा २) एक उत्तर भारतीय आडनाव ३) राजाची बायको; क्वीन ४) दशानन; रावण ५) विशिष्ट कंपू किंवा समूह ६) गोंद; डिंक १०) रव्यापासून बनविला जाणारा एक गोड पदार्थ ११) सोन्याचा पर्वत १२) नटून सजून गावभर हिंडणारा १४) वाकलेला; झुकलेला १५) इराणची राजधानी २१) लहान मुलाच्या डोक्यावरचे मूळचे केस २३) हक्क; फिर्याद; दुष्मनी; शत्रुत्व

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : आयुष्यातील आनंदी क्षणासाठी पैशाने कमविलेल्या वस्तुंपेक्षा स्वभावाने कमविलेली माणसे जास्त सुख देतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### भारतातील कोणते शहर ट्रॅफिक सिग्नल विरहित आहे?

कोणत्याही शहरातील वाहतूक व्यवस्था व्यवस्थापित करण्यासाठी वाहतूक सिग्नल आवश्यक असतात. लहान शहर असो किंवा मेट्रो शहर, जर येथे काही समस्या असेल तर ती रस्त्यांवरील वाहतूक कोंडी आहे. पण तुम्हाला माहिती आहे का की भारतात असे एक शहर आहे जिथे वाहतुकीसाठी लाल दिवा नाही. राजस्थानमधील कोटा शहरात ट्रॅफिक सिग्नल नाहीत. बरं, कोचिंग सिटी म्हणून प्रसिद्ध असलेल्या या शहरात, वेगवेगळ्या भागातील विद्यार्थी वैद्यकीय आणि अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांची तयारी करण्यासाठी येतात. पण या शहराबद्दल याशिवाय आणखी एक गोष्ट ज्ञात आहे, ती म्हणजे ट्रॅफिक सिग्नल. कोटा हे जगातील दुसरे शहर आहे जे ट्रॅफिक सिग्नल मुक्त आहे. भूतानची राजधानी थिंपू हे असे करणारे पहिले शहर आहे. कोटा शहर आता सिग्नल फ्री आहे आणि असे करणारे भारतातील पहिले शहर आहे, कोटामधील जवळजवळ प्रत्येक चौकातून सिग्नल काढून टाकण्यात आले आहे. ओव्हर ब्रिज आणि अंडरपासमुळे शहराचा वेग बदलला आहे. वाहनांचा वेगही बदलला आहे. त्याचबरोबर या शहराला वाहतूक कोंडीतून मुक्तता मिळाली आहे.

### परिणाम

एकदा एका शेतकऱ्याकडे पाच म्हशी आणि एक गाय होती. तो दिवसभर सर्व म्हशींची काळजी घेत असे. तो दूरवरून हिरवे गवत कापून त्यांना खायला घालत असे. दररोज सकाळी आणि संध्याकाळी इतके दूध उत्पादन होत होते की शेतकऱ्याच्या कुटुंबाला ते विकावे लागले.

त्यामुळे त्याची आर्थिक परिस्थितीही मजबूत होत होती. काही दिवसांपासून, शेतकरी काळजीत होता कारण एका मोठ्या मांजरीने त्याच्या स्वयंपाकघरावर लक्ष केंद्रित केले होते.

शेतकरी आराम करायचा, मांजर दूध पिऊन ते अशुद्ध करायचे. एके दिवशी, निराश होऊन, शेतकऱ्याने मांजरीला धडा शिकवण्याचा निर्णय घेतला. ज्युटच्या पोत्याचा वापर करून सापळा रचण्यात आला, ज्यामुळे मांजर सहज पकडले गेले. शेतकऱ्याने प्रथम तिला काठीने मारण्याचा विचार केला. शेतकऱ्याने माचीची काडी पेटवली आणि पोत्यावर फेकली. काही वेळातच पोती जळू लागली आणि मांजर तिच्या सर्व शक्तीनिशी धावली. मांजर जिथे जिथे पळत होती तिथे तिथे पोतीही धावत होती. गावात सर्वत्र आगीचा डोंब होऊन शेतकऱ्याचे घरही त्यात पेटले गेले आणि खूप मोठे नुकसान झाले.

तात्पर्य : कृती करण्याची आधी परिणामांचा विचार करावा.

## जीवन का अमृत (भाग १)



### पवित्र सच्चाई

पर नामलेवाओं का रास्ता बिल्कुल साफ है। उन्हें अपने आपको प्रभु-सत्ता से जोड़ना है। और क्योंकि प्रभु प्रेम है, उन्हें भी प्रेम की किरणें सभी तक फैलानी हैं। वे सत्गुरु की छत्रछाया में हैं और उन्हें अपने भौतिक शरीरों की चिंता करने की कोई जरूरत नहीं। यह एक खोल है और कभी-न-कभी, इसे छोड़ना ही होगा।

१२. आपने पवित्र सच्चाई को समझा है। इससे दूसरों को प्रेरणा मिलेगी, ताकि सत्गुरु की दया से, उनका भाग्य भी सुधरे। आपको पुस्तक Crown of Life की प्रति मिल चुकी है, जिसके लिए भी आप कृतज्ञ हैं और इससे आप में नए विचार प्रकट होंगे। पवित्र शब्द से पूरी तरह जुड़कर आपकी आत्मा को असीम शांति प्राप्त होगी, यह जगमगा उठेगी और दूसरों को फैज पहुँचाएगी।

१३. मुझे खुशी है कि आपको हाल की बीमारी से तीव्र और आश्चर्य- जनक स्वास्थ्य लाभ हुआ। आज्ञाकारी और अनुशासित भक्त ऐसी भौतिक कठिनाईयों को खुशी-खुशी झेल जाते हैं और सही सलामत रहते हैं।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### केलेली टिका प्रेरणा ठरते

त्याचा वापर मी केला तरच त्यातून काही निष्पन्न होतं. त्याचा संबंध ही 'भेट' देण्यापुरताच मर्यादित असतो. ती भेट कशी वापरायची आणि त्यातून काय निष्पन्न होईल ह्यावर देणाऱ्याचं नियंत्रण नसतं. देणाऱ्याची भूमिका देण्यापुरतीच मर्यादित असते. ती भेट कशी वापरायची आणि त्यातून काय निष्पन्न करायचं ही शक्ती संपूर्णपणे माझ्याकडे आहे. काही लोक म्हणतात की यश मिळवण्यासाठी एखाद्या व्यक्तीने केलेली टीका त्यांच्यासाठी प्रेरणा ठरते.

सुरेश ओबेरॉय : याचा अनुभव मी स्वतः अनेकदा घेतला आहे.

शिवानीदीदी : समजा, हे तुम्ही करू शकत नाही, असं जर तुम्हाला कोणी म्हटलं तर?

सुरेश ओबेरॉय : तर मी स्वतःला त्या माणसासमोर नक्कीच सिद्ध करेन.

शिवानीदीदी : पण काही लोक असे असतात जे 'तुम्ही काहीही करू शकत नाही' अशा विधानांचा स्वीकार करून त्यावर विश्वास ठेवतात. समोरच्या माणसाने हे 'गिफ्ट' तुम्हाला देणं इथपर्यंतच त्याची भूमिका आहे पण त्याचा वापर कसा करायचा हे सर्वस्वी माझ्यावर अवलंबून आहे. (क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगी : काय करतोयस? मुलगा : मच्छर मारतोय.
मुलगी : किती मारले? मुलगा : ५ मारले... ३ फीमेल आणि २ मेल.
मुलगी : तुला कसं कळलं की कोण मेल आहे आणि कोण फीमेल ?
मुलगा : साधं आहे गं... ३ आरशावर बसले होते आणि २ बिअरच्या बाटलीवर !

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ महिला प्रिमियर लिग डब्ल्यूपीएलचा तिसरा सिझन कोणत्या कालावधीत झाला? - १४ फेब्रू ते २५ मार्च

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'स्व संवाद तुटणं...'

एका महिला मंडळाने नवरात्रोत्सवात माझे 'सुयशमार्ग' प्रेरणादायी संवाद व्याख्यान ठेवले होते. सवयीनुसार दिलेल्या वेळेच्या दहा मिनिटे अगोदर मी तेथे हजर झालो. कार्यक्रम वेळेवर सुरु झाला. माझे व्याख्यान दिड तास झाले. व्याख्यानानंतर प्रश्न विचारले त्या प्रश्नांना मी उत्तरं दिली. ह्या कार्यक्रमाचं वैशिष्ट्य म्हणजे महिलांनी मुला, मुलींना व्याख्यान ऐकण्यासाठी आवर्जुन आणलं होतं. एका मुलाने मला प्रश्न विचारला स्वसंवादाविषयी तुम्ही सविस्तरपणे सांगितलं. स्व संवाद का तुटतो? ह्या प्रश्नाचं उत्तर सांगा. उपस्थित सर्वांनाच मी दोन्ही डोळे मिटवुन घ्यायला सांगितले आणि मी लिहिलेली 'यशो – शिखर' कथा ऐकवली. डोळे उघडायला सांगुन मी प्रश्न विचारले. योग्य उत्तर सांगणारांना पेन बक्षिस दिले. ह्या यशोशिखर अनुभुतीमुळे स्व संवादाचं महत्व उपस्थितांना समजलं. स्व संवाद तुटण्याची कारणं सांगतांना मी सांगितलं की स्व संवाद तुटण्याची प्रत्येक व्यक्तीची कारणं वेगवेगळी असु शकतील कदाचित ती कारणं नोकरी, व्यवसायाशी निगडित असतील अथवा आवडी-निवडीशी निगडित असतील. पण स्वसंवाद तुटणं हे नक्कीच वाईट आहे. खरं तर, दररोज किमान १० ते १५ मिनिटे स्व संवाद साधलाच पाहिजे. स्व संवाद हे स्वतःला त्रयस्थ म्हणुन पाहाणं असु शकतं आणि सर्वात महत्वाचं म्हणजे स्व संवाद ही स्वसाठी प्रचंड मोठी ताकद आहे, प्रेरणा आहे. समजा मी मोबाईल हातात घेतला आणि समाज माध्यमात गेलो की मग पुढचा किती वेळ मी समाज माध्यमात असणार आहे हे नक्की सांगता येत नाही. पण नेमका तोच क्षण स्व संवाद साधण्यासाठी दिला तर समाज माध्यमात असण्याचा वेळ अत्यंत कमी होऊ शकतो. कंटाळा हे एक आणखी एक महत्वाचं कारण आहे स्वसंवाद तुटण्याचं. रोजच काय स्व संवाद साधायचा ? हा प्रश्न अगदी साधा आहे पण आपल्या प्रगतीसाठी अडथळा आणणारा प्रश्न आहे. आजच उद्यावर ढकलणं हे सुध्दा स्व संवाद तुटण्याचं कारण आहे. स्वतःचं महत्व, आपल्या स्वतःलाच माहित असतं. आपलं स्वतःच, स्वतःचे चांगले मित्र असु शकतो. मग ह्या स्व मित्राशी संवाद साधण्यासाठी इतर कोणत्याही कारणांची, मुहुर्ताची गरज नाही. स्व संवाद साधण्यापुर्वी एखादी कृती मनाविरुध्द घडणं हे सुध्दा स्व संवाद तुटण्याचं कारण आहे. खरं तर ती मनाविरुध्दची कृती तात्काळ स्वीकारुन स्व संवाद साधलाच पाहिजे. काही व्यक्तींचं निवासस्थान हे गडबड, कलकलाट, गाड्यांचे वाजणारे हॉर्न्स अशा प्रकारे मुख्य रस्त्यापासून अगदी जवळच असतं. त्यामुळे ते स्व संवाद साधु शकत नाहीत. कारण स्व संवाद साधतांना त्या गोंधळ. कलकलाटामुळे स्वतःशी एकरुप होऊ शकत नाही, शारिरिक आणि मानसिक दृष्ट्या ते एक होऊ शकत नाही. अर्थात स्व संवाद साधण्यासाठी शांत वातावरण हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. समजा, रोजच्या सवयीनुसार पुढच्या १० मिनिटांत स्व संवाद साधण्यासाठी बसायचं आहे आणि त्याचवेळी पाहुणे आले तर आपलं नियोजन कोलमडतं. अशा वेळी स्वतःला व्यवस्थित सांगणं प्रचंड महत्वाचं आहे. त्या विशिष्ठक्षणी अर्थात स्वसंवाद साधण्यापुर्वी आपली स्वतःची शारिरिक अन् मानसिक स्थिती नेमकी कशी आहे हे पाहाणंही अत्यंत महत्वाचं आहे. समजा अंगात ताप असेल अथवा डोकं दुःखत असेल तर आपण स्व संवाद साधुच शकणार नाही. एखादी गोष्ट मनापासुन करावी वाटणं ही सर्वात महत्वाची बाब आहे. स्व संवाद साधावाच असं स्वतःला मनापासून वाटत नाही तोपर्यंत स्वसंवाद तुटलेलाच असणार. स्व संवाद तुटणं आपल्या स्वतःला नक्कीच परवडणारं नाही. स्व संवाद तुटण्यामुळे होणारा तोटा भरुन निघु शकणार नाही. मला सगळं काही समजतं, मला भरपूर अनुभव आहे, माझा भरपूर अभ्यास आहे, मला स्व संवादाची गरज नाही – हा विचार आणि ह्या विचारानुसार केलेली कृती, स्व संवाद साधण्यातला अडथळा आहे. स्व संवादात मनाचं महत्व अनन्यसाधारण आहे. मी स्व स्वंवाद साधलाच हे प्रत्येकाला मनापासून वाटलंच पाहिजे. हे असं न वाटणं हे स्व संवाद तुटण्याचं कारण आहे. घरातल्या लहानग्याचं रडणं, हट्टी स्वभाव हे सुध्दा स्व संवाद तुटण्याचं कारण होऊ शकतं. शेजारच्या घरातल्या टिव्हीचा आवाज, कुत्र्यांचं भुंकणं ह्यांसह अनेक घटकांमुळे स्व संवाद तुटु शकतो. एखादी व्यक्ती फार वेळ बसु शकत नाही, एकाच जागेवर, हेसुध्दा स्व संवाद तुटण्याचं कारण असु शकतं. माझ्या ह्या उत्तरामुळे तो मुलगा म्हणाला की तुम्ही अत्यंत महत्वाची कारणं सांगितली आहेत स्व संवा तुटण्याची. ही सगळी कारण मी लक्षात ठेवणार आहेच व इतरांनाही सांगणार आहेच कारण निदान ते तरी ह्या स्व संवाद तुटण्याच्या कारणांवर मात करु शकतील.

(लेख क्र.५९८)

– **सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### सुकामेवा

या कवचाच्या आतमध्ये मानवी मेंदूशी बरेच साम्य असलेले तेलयुक्त बी असते. त्यामुळे मेंदूच्या दुर्बलतेवर अक्रोड सेवन केले, तर मेंदू बलवान होऊन त्यात अनेक औषधी गुणधर्म मदूची कार्यक्षमता वाढीस लागते. हेच अक्रोड बी पौष्टिक असून,

औषधी गुणधर्म : आयुर्वेदानुसार : अक्रोड बीचा गर चवीला तुरट, मधुर, विपाक कटू व उष्ण वीर्यात्मक असून, पित्तकर आणि वातघ्न आहे.

आधुनिक शास्त्रानुसार : अक्रोडमध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, 'अ' व 'ब' जीवनसत्त्वे, प्रथिने, उष्मांक, तंतुमय व पिष्टमय पदार्थ असतात. या सर्व घटकांमुळे अक्रोड मेंदूची दुबर्लता कमी करून त्याला बलवान करण्याचे महत्त्वाचे काम करतो. इतर सुकामेव्यासोबत अक्रोड खाल्ल्यास तो जास्त फायदेशीर ठरतो.

उपयोग : १) अक्रोड हा पौष्टिक असल्याने शरीर कृश असलेल्यांनी व अशक्तपणा जाणवणाऱ्यांनी सकाळी उठल्याबरोबर दोन-तीन अक्रोड इतर सुकामेव्यासोबत खावेत.

२) शुक्रजंतू कमी असल्यामुळे वंध्यत्व निर्माण झालेल्या पुरुषांनी अक्रोडचे नियमित सेवन करावे.

३) अक्रोड वातघ्न असल्यामुळे संधिवात या आजारावर उपयुक्त आहे. संधिवात असणाऱ्यांनी सात- आठ अक्रोडचे सेवन करावे.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



रयत शिक्षण संस्था संचलित कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेने 'लक्ष्यवेध' राज्यस्तरीय परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची छाप उमटवली.

# 'लक्ष्यवेध' राज्यस्तरीय परीक्षेत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेचे यश

## तब्बल ८९ विद्यार्थी गुणवत्ता यादीत; राज्य गुणवत्ता यादीतही २७ विद्यार्थी चमकले

नगर – रयत शिक्षण संस्था संचलित कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेने 'लक्ष्यवेध' राज्यस्तरीय परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची छाप उमटवली. शाळेतील तब्बल ८९ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. यामध्ये २७ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत, तर ४३ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत आणि १९ विद्यार्थी केंद्र गुणवत्ता यादीत झळकले आहेत.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करुन गौरव करण्यात आला. हा कार्यक्रम रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी डॉ. निक्रड, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर, पालक संघाचे सदस्य कैलास गुंजाळ तसेच शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात ज्ञानदेव पांडुळे यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करताना शिस्त, सातत्य आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाल्याचे स्पष्ट केले. गुणवंत विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका मीनाक्षी खोडदे, उर्मिला साळुंके, सुजाता दोमल, शितल रोहकले, रुपाली वाबळे, सौ. अनभुले, जयश्री खांदोडे, इंदुमती दरेकर, कांचन मदने, पूनम धाडगे, रूपाली पांडुळे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सहविभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी, प्रमोद तोरणे, तसेच लाइफ मेंबर सदस्य शिवाजी लंके यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

परीक्षेतील गुणवंत पुढीलप्रमाणे – इयत्ता पहिली : ओजस्वी भोरे (राज्यात तिसरी), जेसीएल कसोटे (तिसरा), शुभ्रा साळुंखे (चौथी), अद्रिका शिर्के (पाचवी), संयुक्ता लटपटे (पाचवी), शौर्य कांडेकर (पाचवा), वेद खराडे (पाचवा), आर्वी चौरे (पाचवी), चिरायू जाधव (सहावा), मेहुल दारकुंडे (सहावा), अपूर्व बडवे (सातवा), संस्कृती वायकर (सातवी), श्राव्या बडवे (सातवी)

इयत्ता दुसरी : कैवल्य गारुडकर (पाचवा), सानवी कोहक (पाचवी), ज्ञानश्री नवले (सहावी), स्वर्णिम मोकाटे (सातवा)

इयत्ता तिसरी : रुद्र गुंजाळ (दुसरा), अद्वित खेडकर (सहावा), श्रीराज गुंजाळ (सहावा)

इयत्ता चौथी : आरोही सोनवणे (दुसरी), आयुष सोनमाळी (दुसरा), सरफराज शेख (चौथा), स्वरा दरेकर (चौथा), अनुष्का धामणे (पाचवा), पार्थ जाधव (पाचवा), वेदांत राहिंज (सातवा)

# प्रेरणादायी अक्षरधन

## तुका म्हणे, होय मनाशी संवाद...

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी
चैतन्य पालवी
डॉ.रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

माणसाला प्राप्त झालेले सुंदर असे मानवी मन ही परमेश्वराने स्वतंत्रपणे बहाल केलेली देणगीच. हे मन आपले स्वतंत्र विश्व निर्माण करते. या विश्वात स्वतः ही रमते आणि इतरांनाही रमविते. परमेश्वराने शरीराला अनेक इंद्रिये दिली आहेत. प्रत्येक इंद्रियांचा स्वतंत्र असा एक गुणधर्म आहे. प्रत्येक इंद्रियाचे वेगळे काम आहे पण ते प्रत्येक इंद्रिय मन नावाच्या न दिसणाऱ्या इंद्रियाशी जोडले गेले आहे. आपण कानाने ऐकतो, हाताने काम करतो. डोळ्याने पाहतो पण या सगळ्या क्रियांमध्ये आनंद मिळवायचा असेल तर त्यात मन ओतावे लागते. मोठी माणसे सांगतात मन लावून काम करा, वक्ता सांगतो, माझी भाषणं मन लावून ऐका, नुसते पाहणे हे दिसणे असते! पण मन लावून पाहणे ते दर्शन असते. म्हणजे प्रत्येक क्रियेत मन ओतले की त्या क्रियेलाही एक प्रकारचे श्रेष्ठत्व प्राप्त होते. संतश्रेष्ठ तुकोबारायांनी म्हटले आहे,

घेई घेई माझे वाचे। गोड नाम विठोबाचे ।

मन तिथे जाऊन पोचले तर सर्व इंद्रिये आपोआप जाऊन पोचतील. मनाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की 'मन्यते अनेन इति' ज्याच्या योगाने मनन केले जाते तेच मन होय तर आणखी एक व्याख्या करताना म्हटले आहे की संकल्प आणि विकल्प एकदात्मक वृत्ती ज्याच्या ठिकाणी आहे ते अंतःकरण म्हणजे मन होय. इंद्रियांनाच 'करण' असे दुसरे नाव आहे. पंचज्ञानेंद्रिये किंवा पंचकर्मेंद्रिये ही आपल्याला ज्ञात आहेत. मन हे कोणालाही दिसत नाही पण त्याचे अस्तित्व आणि कर्तृत्व सर्व इंद्रियांना जाणवत असते. मन हे दिसत नसल्याने शरीराच्या आत आहे आणि गुप्त आहे म्हणून त्याला अंतःकरण असे म्हणतात. मानवी जीवनात मन हे इच्छा व्यक्त करते, मिळवते, परमेश्वराचे प्रेम संपादन करते. परमेश्वराची भक्तिही करते किंवा सर्वांची घृणाही करते. काही वेळा राक्षसी वृत्तीलाही ते धार्जिणे होते. कधी ते भयाने थरथरते, विचारमग्न होते, कधी चिकित्सक बनते तर कधी प्रशंसकही बनते. असे असले तरी परिस्थितीचे योग्य आकलन मनच करू शकते. या सर्वांचे साधन एकमेव मन आहे. आपल्याला लाभलेल्या मनाचा आपल्याच मनाशी संवाद घडविणे हाच मनाच्या दृढतेचा उपाय ठरू शकतो.

– किशोर गांधी

# सर्वसामान्य कुटुंबातील मुलांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्न करते

## रामचंद्र दरे यांचे प्रतिपादन, विद्या प्रतिष्ठान संचलित हेडगेवार अहमदनगर प्रज्ञाशोध परीक्षा, हिंद सेवा मंडळ आयोजित स्टुड टॅलेंट परीक्षा व मंथन राजस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत महाराष्ट्र बालक मंदिरचे घवघवीत यश

नगर – शाळेने मिळवलेले यश हे निश्चितच कौतुकास्पद आहे या यशामागे शिक्षकांचे कष्ट, मुलांनी घेतलेली मेहनत आहे कोणतेही यश मिळवण्यासाठी सातत्य, चिकाटी, जिद्द, प्रबळ इच्छाशक्तीची गरज असते सर्वसामान्य कुटुंबातील मुलांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्न करते, असे प्रतिपादन अ.जि.म.विदया प्रसारक समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांनी केले.

विद्या प्रतिष्ठान संचलित हेडगेवार अहमदनगर प्रज्ञाशोध परीक्षा, हिंद सेवा मंडळ आयोजित स्टुड टॅलेंट परीक्षा व मंथन राजस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत महाराष्ट्र बालक मंदिरचे तब्बल ६२ विद्यार्थी विविध स्तरांवरील गुणवत्ता यादीत स्थान मिळवल्याबददल मार्गदर्शक शिक्षक व गुणवंत विद्यार्थी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अ.जि.म.विदया प्रसारक समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार अँ ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, ज्येष्ठ विश्वस्त जी.डी. खानदेशे, विश्वस्त जयंत वाघ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अर्जुन पोकळे, माजी मुख्याध्यापक सुमन गोसावी, छाया रासकर, सुरेश शेवाळे, मुख्याध्यापिका अर्चना गिरी आदी उपस्थित होते

अर्चना गिरी म्हणाल्या प्राथमिक शिक्षण हे आयुष्यात महत्वाचे असून हे शिक्षण पाया असून भावी करीअर करीता अत्यंत महत्वाचे ठरते.तुम्ही शिक्षण कसे घेता याला अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे प्राथमिक शिक्षण हा पाया असल्याने तो भक्कम होणे गरजेचे आहे तेच आम्ही करत आहोत.

या विद्यार्थ्यांना उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर व सचिव ॲड. विश्वासराव आठरे यांनी शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थ्यांना सौ.वैशाली मंगलारम, सौ. आशा कराळे, श्रीमती भारती तांबे आदींनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक श्रीमती भारती तांबे यांनी केले. सुत्रसंचलन सुनिता शेवाळे यांनी केले. सुनिता सासवडे यांनी आभार मानले.



विद्या प्रतिष्ठान संचलित हेडगेवार अहमदनगर प्रज्ञाशोध परीक्षा, हिंद सेवा मंडळ आयोजित स्टुड टॅलेंट परीक्षा व मंथन राजस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत महाराष्ट्र बालक मंदिरचे तब्बल ६२ विद्यार्थी विविध स्तरांवरील गुणवत्ता यादीत स्थान मिळवल्याबददल मार्गदर्शक शिक्षक व गुणवंत विद्यार्थी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अ.जि.म.विदया प्रसारक समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, ज्येष्ठ विश्वस्त जी.डी. खानदेशे, विश्वस्त जयंत वाघ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अर्जुन पोकळे, माजी मुख्याध्यापक सुमन गोसावी, छाया रासकर, सुरेश शेवाळे, मुख्याध्यापिका अर्चना गिरी आदी. (छाया – उदय जोशी)

**गुणवंत विद्यार्थी – (हेडगेवार प्रतिष्ठान)** – शौर्य टकले जिल्ह्यात पाचवा, श्लोक कोतकर जिल्ह्यात सहावा, सोहम सिनारे जिल्ह्यात दहावा, युवराज ठुबे जिल्ह्यात दहावा, कानिफ घोडके जिल्ह्यात तेरावा, स्वराजंली उगले जिल्ह्यात १३ वी, स्वानंद दहिफळे जि १६ वा, सौरभ गायकवाड जि १७ वा, प्रत्युषा शिंदे जि १७ वी, श्रावणी दारकुंडे जि १८ वी, काव्या लांडगे जि १९ वी, दर्शील सानप जि २० वा

**गुणवंत विद्यार्थी – (मंथन परीक्षा)** – अद्वैत कवडे राज्य दुसरा, आर्या सरोदे जिल्हा चौथी, शिवांश बुधवंत जिल्ह्यात पाचवा, शौर्य जठार केंद्रात पहिला, स्वरांश माळी केंद्रात तिसरा, आर्वी भिंगारदिवे केंद्रा चौथी, साईराज मंत्री केंद्र सातवा, शांभवी गायखे केंद्रात आठवी, अद्रिका येठेकर केंद्रात नववी, सुयश पिसे केंद्रात दहावा, आर्यन आंबेकर केंद्रात पहिला, आरोही खेडकर केंद्रात पहिली, ओजस्वी शेवाळे केंद्रात चौथी, भारवी तळेकर केंद्र सातवी, शांभवी उंडे केंद्र सातवी, राधिका आठरे केंद्रात दहावी, आरव कोतकर केंद्रात दहावा, आधिराज शिंदे जिल्ह्यात सातवा, अन्वय गिर्हे केंद्र सहावा, कैवल्य काळे केंद्र सहावा, वरद पावडे केंद्रात आठवा, विहान गवळी केंद्रात आठवा, अंगद वाळुंज केंद्रात अकरावा, गगनदीप दातीर केंद्र अकरावा, तनिष घुमरे केंद्र अकरावा, दिव्या जोर्वे केंद्रात बारावी, शिवेंद्र आटोळे केंद्र तेरावा, विराज तुळेकर केंद्रात १५ वा, विराज उंडे केंद्रात १५ वा, आरव कोहक केंद्रात १५ वा, श्रावणी दारकुंडे जिल्ह्यात आठवी, शौर्य टकले जिल्ह्यात आठवी, कानिफ घोडके जिल्हा चौथा

स्वरांजली उगले केंद्रात पाचवी, विराज गरुड केंद्रात आठवा, स्वानंद दहिफळे केंद्र दहावा, सोहम सिनारे केंद्रात अकरावा, श्लोक कोतकर केंद्रात बारावा, कौस्तुभ गावडे केंद्रात तेरावा, युवराज ठुबे केंद्रात तेरावा, शिवांश शेलार केंद्रात १५ वा

**स्टुडन्ट टॅलेंट सर्च परीक्षा गुणवंत विद्यार्थी** – आधिराज शिंदे जिल्ह्यात दहावा, अन्वय गिर्हे केंद्रात दुसरा, गगनदीप दातीर केंद्रात दुसरा, कानिफ घोडके जिल्ह्यात तेरावा, शौर्य टकले जिल्हा सोळावा, काव्या लांडगे जिल्हा सोळावी, स्वरांजली उगले जिल्ह्यात सतरावी, स्वानंद दहिफळे केंद्रात दुसरा, अनन्या कुटे केंद्रात तिसरी



चित्रकूट गुरुकुलचा वार्षिक दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

# चित्रकूट गुरुकुलचा वार्षिक दिन सोहळा उत्साहात साजरा

नगर – चित्रकूट गुरुकुलचा वार्षिक दिन सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. या कार्यक्रमातून २०२५ या शैक्षणिक वर्षाचा संस्मरणीय समारोप करण्यात आला. यंदाच्या वार्षिक दिनाची संकल्पना 'चॉकलेटचे जग' ही होती. संपूर्ण शाळेचा परिसर चॉकलेटच्या आकर्षक सजावटीने नटवण्यात आला होता. यामुळे मुलांसाठी आणि पालकांसाठी एक जादुई, गोड वातावरण तयार झाले होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्या खुर्शीद दमानिया अंगोलकर यांच्या स्वागताने झाली. यावेळी हेमा चव्हाण यादेखील उपस्थित होत्या. मुलांनी चॉकलेटच्या संकल्पनेवर आधारित नृत्य, नाटिका आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, हावभाव आणि ऊर्जेने सर्व उपस्थितांची मने जिंकली.

प्राचार्या सारिका आनंद यांनी शाळेचे वार्षिक प्रगतीपुस्तक सादर करीत विद्यार्थ्यांची वर्षभरातील कामगिरी मांडली.

'चॉकलेट्स आनंददायी असतात, पण ते नेहमी मर्यादेतच खावीत' हा अर्थपूर्ण संदेश देण्यात आला. पालकांना आणि मुलांना आरोग्यदायी सवयी लावण्यासाठी व साखरेचे अतिरिक्त सेवन टाळण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. हास्य, टाळ्या आणि गोड आठवणींसह सोहळ्याची सांगता झाली. मुलांसाठी, पालकांसाठी आणि कर्मचाऱ्यांसाठी हा दिवस खरोखरच अविस्मरणीय ठरला.

# पुस्तक वाचनातून मनाची सुंदरता बहरत

### उद्योजक नंदकुमार आढाव

नगर – शरीर सुदृढ व संपन्न होण्यासाठी जशी व्यायामाची आवश्यकता असते तसेच मनाच्या आणि विचारांच्या सुंदरतेसाठी वाचनाची आवश्यकता असते. ग्रंथ संकलन...त्याचे वाचन आणि त्याची भेट देणे यातून ही सुंदरता अधिक बहरते. जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने ही आदर्शवत कृती प्रत्येक कुटुंबातून व्हावी असे प्रतिपादन उद्योजक नंदकुमार आढाव यांनी व्यक्त केले.

अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात महान लेखक विल्यम शेक्सपिअर यांच्या जयंतीनिमित्त जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून आयोजित पुस्तक प्रदर्शन उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी वाचनालयाचे उपाध्यक्ष दिलीप पांढरे, संचालिका ज्योती कुलकर्णी, कवी चंद्रकांत पालवे, राहुल तांबोळी, अविनाश रसाळ, ग्रंथपाल अमोल इथापे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल, वाचक, व कर्मचारी उपस्थित होते.



अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात महान लेखक विल्यम शेक्सपिअर यांच्या जयंतीनिमित्त जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून आयोजित पुस्तक प्रदर्शन उद्घाटन प्रसंगी बोलताना उद्योजक नंदकुमार आढाव.

## अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात पुस्तक दिनानिमित्त विल्यम शेक्सपियर यांच्या साहित्याचे ग्रंथ प्रदर्शन

कवि चंद्रकांत पालवे यांनी याप्रसंगी बोलताना महान साहित्यिक शेक्सपिअर यांनी त्यांच्या साहित्यातून जगाला मोठी देणगी व आदर्श जीवन जगण्याची प्रेरणा दिली आहे. त्यांच्या जयंतीदिनी आपण प्रत्येकाने साहित्याची, आणि वाचनाची कास धरून आपले जीवन समृद्ध करावे असा आशावाद व्यक्त केला.

प्रास्ताविकात ज्योती कुलकर्णी यांनी जिल्हा वाचनालय गेली दोन दशके वाचनाचा समृद्ध वारसा चालवत आहे. उगवत्या पिढीने साहित्यिक शेक्सपियर यांचा आदर्श समोर ठेवून वाचन संस्कृती आपली करून स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

लेखक विल्यम शेक्सपिअर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या साहित्याच्या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन केले. ग्रंथपाल अमोल इथापे यांनी आभार मानले. यावेळी वाचक व कर्मचारी उपस्थित होते.

# सौ.वनिता मानकर यांचे महिला सबलीकरणाचे उत्कृष्ट कार्य

### विक्रम पाठक यांचे प्रतिपादन

नगर – श्री जिव्हेश्वर महिला मंडळाचे अध्यक्षा सौ.वनिता मानकर यांनी जिव्हेश्वर महिला मंडळाच्या माध्यमातून महिलांनासाठी एक व्यासपीठ निर्माण केले आहे. महिलांना बचत गटाच्या माध्यमातून व्यवसाय करण्यासाठी सातत्याने प्रेरणा देण्याचे काम ते करीत आहे. महिला सबलीकरणासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन रायगड येथील छत्रपती कर्तुत्वभूषण पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले आहे. ही साळी समाजासाठी अभिमानास्पद बाब आहे. सौ. वनिता मानकर यांचे महिला सबलीकरणाचे केलेले कार्य उत्कृष्ट आहे, असे प्रतिपादन स्वकुळसाळी हित संवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक यांनी केले आहे.



सौ.वनिता गणेश मानकर यांना श्री छत्रपती कर्तृत्व भूषण पुरस्कार ने सन्मानित करण्यात आला.

## श्री छत्रपती कर्तुत्व भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल विविध सामाजिक संस्थांच्या वतीने नागरी सत्कार

श्री जिव्हेश्वर महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.वनिता गणेश मानकर यांना नुकतेच श्री छत्रपती कर्तृत्व भूषण पुरस्कार ने सन्मानित करण्यात आला. याबद्दल त्यांच्या विविध सामाजिक संस्थांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळ, श्री जिव्हेश्वर मित्र मंडळ दिल्लीगेट, श्री लक्ष्मीनारायण नागरी पतसंस्था, आर्ट ऑफ लिविंग, वेस्ट पेपर मर्चंट असोसिएशन, श्री जिव्हेश्वर महिला मंडळ यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विक्रम पाठक, सेक्रेटरी विजय मानकर, खजिनदार गजेंद्र सोनवणे, योगेश पांढरपोटे, श्री जिव्हेश्वर मित्र मंडळ दिल्ली गेट चे अध्यक्ष संजय सागांवकर, विनायक नाटाळे, मोहन ठाणेकर, उल्हास ढोरे, संजय दळवी, योगेश भागवत, लक्ष्मीनारायण नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष सौ. मिनलताई बोरा, उपाध्यक्ष सौ.स्वाती गुंदेचा, कार्यकारी संचालक नरेंद्र बागडे, गणेश मानकर, ॲड.अभिजीत कोठारी, निकिता कनोरे, व्यवस्थापक संतोष वल्ली, आरती ढोरे, अमृता कांबळे, आर्ट ऑफ लिविंग चे जिल्हा समन्वय प्रकाश लोखंडे, योगा टीचर नरेंद्र बोठे, सुभाष लोणावत, माधुरी लोणावत, दत्तात्रय आंधळे, नूतन आंधळे, अंबादास वल्लाकट्टी, इंजिनीयर असोसिएशनचे ईश्वर बोरा, कुणाल बुरगुल, वेस्ट पेपर मर्चंट चे राजेश बजाज, अजित बोरा, संजय कोठारी, रणरागिणी महिला फाउंडेशनच्या सौ.रोहिणीताई पवार, सौ.ज्योतीताई पवार, सौ.विजयालक्ष्मी लयचेट्टी, जिव्हेश्वर महिला मंडळाच्या सौ.शैलाताई मानकर, छायाताई साळी, शुभदा वल्ली, विशाखा मानकर, अनिता मानकर, सुनिता मानकर, स्नेहा पाठक, चेतना मानकर, शितल सागांवकर, विद्या सवई, अलकाताई नाटाळे, मिराबाई ठाणेकर, अंजली खिदारे आदी उपस्थित होते.

लक्ष्मीनारायण पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ.मीनल बोरो म्हणाल्या, सौ.वनिता मानकर या रांगोळी व मेहंदी आर्टिस्ट असून त्यांनी आत्तापर्यंत १०० मुलींना शिक्षण देऊन त्यातून रोजगार उपलब्ध करून दिला आहे. प्रामाणिकपणे, निष्ठेने व सातत्यपूर्ण परिश्रमांद्वारे उल्लेखनीय कार्य केले असून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेले योगदान अत्यंत प्रेरणादायी व मोलाचे आहे.

सत्काराला उत्तर देताना सौ.वनिता मानकर म्हणाल्या, मी या सत्काराने भारावूनन गेले आहे.विविध सामाजिक संस्था व समाजाच्या पाठिंब्यामुळे मला समाज कार्य करण्यासाठी एक नवीन ऊर्जा मिळाली आहे. श्री जिव्हेश्वर महिला मंडळाच्या माध्यमातून या पुढील काळातही अनेक उपक्रम महिलांसाठी राबविण्यात येणार आहे. तसेच महिलांना उद्योजकता प्रशिक्षण मिळावे यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छाया साळी यांनी केले. नरेंद्र बोठे यांनी आभार मानले.

कार्यक्रमासाठी शहरातील विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व साळी समाज बांधव व भगिनी उपस्थित होते.

# भविष्य निर्वाह निधी प्रकरणी २९ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर आमरण उपोषण




नगर – श्रीगोंदा नगरपरिषदेतील कंत्राटी कामगारांचा मागील दोन वर्षांपासून थकीत असलेल्या भविष्य निर्वाह निधी (पी.एफ) प्रकरणी संताप उफाळून आला असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) गटाच्यावतीने आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक निकाळजे यांच्या नेतृत्वाखाली आणि दक्षिण जिल्हाध्यक्ष निलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधून कामगारांच्या प्रलंबित मागण्यांकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली.

कामगारांच्या म्हणण्यानुसार, यापूर्वीही अनेक वेळा तोंडी व लेखी पाठपुरावा करण्यात आला होता. २९ जुलै २०२५ रोजी संबंधित कार्यालयाने प्रत्येक महिन्याला पी.एफ देयकासोबत दिला जाईल असे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, त्या आश्वासनाची अंमलबजावणी अद्याप झालेली नसून, दोन वर्षांपासून पी.एफ थकीतच असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यामुळे संतप्त झालेल्या कामगारांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) गटाच्या माध्यमातून दक्षिण जिल्हाध्यक्ष निलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्पष्ट इशारा देत सांगितले की, २९ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे सर्व कामगार काम बंद ठेवून आमरण उपोषण सुरू करण्यात येणार आहे.

# मूत्रसंस्थेचे आजार

## जनजागृतीची गरज आणि आरोग्याची जबाबदारी

आजच्या बदलत्या जीवनशैलीमध्ये माणूस प्रगतीच्या दिशेने झपाट्याने पुढे जात असला तरी आरोग्याच्या बाबतीत मात्र अनेकदा निष्काळजीपणा दिसून येतो. विशेषतः मूत्रसंस्थेशी संबंधित आजारांविषयी समाजात अजूनही पुरेशी जागरूकता नाही. लघवीसंबंधित त्रास, किडनीचे आजार किंवा पुरुषांमधील प्रोस्टेटच्या समस्या या सुरुवातीला साध्या वाटणाऱ्या तक्रारी अनेकदा गंभीर स्वरूप धारण करतात. त्यामुळे या आजारांविषयी योग्य माहिती असणे आणि वेळेत उपचार घेणे अत्यंत आवश्यक आहे.

मूत्रसंस्था ही आपल्या शरीरातील एक महत्त्वाची प्रणाली आहे. किडनी, मूत्रवाहिन्या, मूत्राशय आणि मूत्रमार्ग या अवयवांच्या माध्यमातून शरीरातील अपायकारक पदार्थ बाहेर टाकले जातात. या प्रणालीमध्ये कोणतीही बिघाड झाली तर त्याचा परिणाम संपूर्ण शरीरावर होतो. त्यामुळे या प्रणालीचे आरोग्य टिकवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

वयोमानानुसार पुरुषांमध्ये प्रोस्टेट ग्रंथी वाढण्याची समस्या सामान्यपणे दिसते. सुरुवातीला लघवी सुरू होण्यास वेळ लागणे, लघवीचा जोर कमी होणे, वारंवार लघवी लागणे, रात्री अनेक वेळा लघवीसाठी उठावे लागणे अशी लक्षणे दिसतात. अनेक जण हे वयामुळे होतंय म्हणून दुर्लक्ष करतात. पण वेळेत उपचार घेतले नाहीत तर लघवी पूर्णपणे बंद होणे किंवा किडनीवर परिणाम होण्याचा धोका निर्माण होतो.

तसेच, मुतखडा हा मूत्रसंस्थेतील सर्वात सामान्य आजारांपैकी एक आहे. आपल्या भागात उष्ण हवामान, पाण्याचे कमी सेवन आणि आहारातील बदल यामुळे या आजाराचे प्रमाण वाढताना दिसते. सुरुवातीला कंबरेत किंवा पोटात वेदना, लघवी करताना जळजळ किंवा कधी कधी लघवीत रक्त येणे अशी लक्षणे दिसू शकतात. अनेकदा लोक वेदना सहन करत राहतात किंवा घरगुती उपायांवर भर देतात, पण योग्य वेळी तपासणी न केल्यास खडा मोठा होऊन शस्त्रक्रियेची गरज भासू शकते.

स्त्रियांमध्ये मूत्रमार्गाचा संसर्ग (UTI) हा खूप सामान्य आहे. स्वच्छतेचा अभाव, कमी पाणी पिणे किंवा काही शारीरिक कारणांमुळे हा त्रास होतो. लघवी करताना जळजळ, वारंवार लघवी लागणे, ताप अशी लक्षणे दिसतात. अनेकदा हा त्रास परत परत होतो, त्यामुळे योग्य तपासणी आणि पूर्ण उपचार घेणे गरजेचे असते.

याशिवाय लघवी धरून न राहणे (मूत्र असंयम) ही समस्या विशेषतः महिलांमध्ये प्रसूतीनंतर किंवा वयोमानानुसार आढळते. ही समस्या अनेक महिलांना सामाजिकदृष्ट्या त्रासदायक वाटते आणि त्यामुळे त्या उपचार घेण्यास कचरतात. पण आज उपलब्ध असलेल्या उपचारांमुळे ही समस्या मोठ्या प्रमाणात नियंत्रणात आणता येते.

मूत्रमार्ग अरुंद होणे (यूरेथ्रल स्ट्रिक्चर) हा आणखी एक महत्त्वाचा आजार आहे. लघवीची धार पातळ होणे, लघवी पूर्ण न होणे, वारंवार संसर्ग होणे अशी त्याची लक्षणे असतात. वेळेत उपचार न केल्यास मूत्राशय आणि किडनीवर गंभीर परिणाम होऊ शकतो.

किडनीचे आजार हे अनेकदा साइलेंट म्हणजे लक्षणे न दाखवता वाढत जातात. मधुमेह आणि उच्च रक्तदाब या आजारांमुळे किडनी हळूहळू निकामी होऊ शकते. त्यामुळे अशा रुग्णांनी नियमित तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. एकदा किडनीचे कार्य खूपच कमी झाले की डायलिसिस किंवा किडनी ट्रान्सप्लांटची वेळ येऊ शकते.

आपल्या ग्रामीण भागात अजूनही लघवीसंबंधित आजारांबाबत लाज, भीती किंवा अज्ञानामुळे लोक डॉक्टरांकडे जाणे टाळतात. आपोआप बरं होईल असा गैरसमज अनेकदा मोठा धोका निर्माण करतो. सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यामुळे साधा आजारही गंभीर स्वरूप धारण करू शकतो.

म्हणूनच, काही साध्या सवयी अंगीकारल्या तर अनेक मूत्रसंस्थेचे आजार टाळता येऊ शकतात. पुरेसे पाणी पिणे, लघवी दाबून न ठेवणे, स्वच्छतेची काळजी घेणे, संतुलित आहार घेणे आणि नियमित व्यायाम करणे या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. मधुमेह आणि रक्तदाब असलेल्या रुग्णांनी त्यांचे नियंत्रण राखणे आवश्यक आहे.

मूत्रसंस्थेचे आजार हे सामान्य असले तरी त्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. वेळेत योग्य सल्ला, तपासणी आणि उपचार घेतल्यास हे आजार पूर्णपणे नियंत्रणात ठेवता येतात. आरोग्य हीच खरी संपत्ती आहे, त्यामुळे त्याची काळजी घेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

आनंदऋषिजी हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असून रुग्णांना दर्जेदार व सुरक्षित उपचार दिले जातात. आमच्या हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक मॉड्युलर ऑपरेशन थिएटर (Modular OT) असून निर्जंतुक व सुरक्षित वातावरणात शस्त्रक्रिया केल्या जातात. याशिवाय सिस्टोस्कोपी, युरेटेरोस्कोपी, नेफ्रोस्कोपी यांसारख्या प्रगत एंडोयुरोलॉजी सुविधा उपलब्ध आहेत. तसेच अचूक निदान व शस्त्रक्रियेसाठी C-Arm मशीनचा वापर केला जातो.



अनुभवी डॉक्टरांसोबतच आमच्याकडे प्रशिक्षित व समर्पित स्टाफ असल्यामुळे रुग्णांची काळजी अत्यंत उत्तम पद्धतीने घेतली जाते.

महत्वाचे म्हणजे, बहुतेक शस्त्रक्रिया व उपचार आयुष्मान भारत योजना अंतर्गत उपलब्ध असल्यामुळे आर्थिकदृष्ट्या सर्वसामान्य रुग्णांनाही उच्च दर्जाचे उपचार मिळतात.

लेखक – **डॉ. अजित बन्सी दरंदले** फोन नंबर ०२४१ – २३२०४७५
एमबीबीएस (बीजे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून रुग्णालय, पुणे
डीएनबी (जनरल सर्जरी – सागर अपोलो हॉस्पिटल्स, बेंगलोर)
एमसीएच (युरोलॉजी)
कन्सल्टंट यूरोसर्जन, आनंदऋषिजी रुग्णालय, अहिल्यानगर.

# योग्यवेळी निदान व उपचाराने मूत्रविकाराच्या सर्व समस्या बऱ्या होतात : डॉ. अजित दरंदले

### आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्येमध्ये मूत्रविकार तपासणी आणि उपचार शिबिरात ६६ रुग्णांची मोफत तपासणी

नगर – मूत्रविकाराच्या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास पुढे जावून ते गंभीर आजाराचे रुप धारण करतात. योग्यवेळी निदान व उपचार केल्यास मूत्रविकाराच्या सर्व समस्या बरे होतात. तसेच आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अद्यावत तंत्रज्ञान आणि तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली यावरील शस्त्रक्रिया अद्यावत मशिनरी, दुर्बीणद्वारे होत आहे. गंभीर आजारांना तोंफलड देण्यापेक्षा योग्यवेळी तपासणी व औषधोपचार हेच निरोगी जीवनाचे मुलमंत्र ठरत असल्याचे प्रतिपादन मूत्रविकार तज्ञ डॉ. अजित दरंदले यांनी केले.



जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आयोजित मूत्रविकार तपासणी आणि उपचार शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी डॉ. अजित दरंदले आदी.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आयोजित मूत्रविकार तपासणी आणि उपचार शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी डॉ. दरंदले बोलत होते. यावेळी मूत्रविकार तज्ञ डॉ. अमेय सांगळे, डॉ. वसंत कटारिया, डॉ. आशिष भंडारी, माणकचंद कटारिया, अभय गुगळे, सुभाष मुनोत, वसंत चोपडा आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. वसंत कटारिया म्हणाले की, हॉस्पिटलची स्थापना करतानाच सेवाभाव हा उद्देश समोर ठेऊन आजपर्यंत रुग्णसेवेचा वसा जोपासला जात आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलचे मोफत शिबिर सर्वसामान्य घटकांना आधार देत आहे. एका छताखाली सर्व आरोग्य सेवा मिळत असल्याने सर्वसामान्यांना याचा लाभ घेणे शक्य होत असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. अमेय सांगळे म्हणाले की, वाढत्या उन्हाळ्यामुळे उष्माघातचे प्रमाण वाढत आहे. किडनी स्टोनचे प्रमाण उद्भवत असून, यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. काही त्रास झाल्यास डॉक्टरांचा सल्ला घेऊन योग्य तपासणी करणे गरजेचे आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मूत्रविकाराच्या सर्व समस्यांवर उपचार उपलब्ध असून, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत या शस्त्रक्रिया होत असल्याची त्यांनी माहिती दिली. तर मूत्रविकार, पोटात दुखणे, लघवीचे त्रास अंगावर न काढता तातडीने प्राथमिक तपासणी करण्याचे आवाहन केले.

या शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी प्रोस्टेट रोग उपचार, युरेथ्रल स्ट्रीचर रोग व्यवस्थापन, पुरुष वंध्यत्व समुपदेशन, मूल्यमापन आणि व्यवस्थापन, महिलांचे मूत्र मार्गातील विकार, मूत्रमार्ग, मुत्राशय, प्रोस्टेट, पुरुषांचे जननेंद्रिय, अंडाशय कर्करोग व्यवस्थापन आदी संदर्भात ६६ रुग्णांच्या मोफत तपासण्या करण्यात आल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. माणकचंद कटारिया यांनी आभार मानले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीतील गैरव्यवस्थेची त्वरित चौकशी करावी

नगर – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमातील गैरव्यवस्थेबाबत भीमशक्तीच्या वतीने मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात आले. संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत हंडोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर जिल्हाध्यक्ष संजय जगताप यांनी हे निवेदन सादर केले.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमातील गैरव्यवस्थेबाबत भीमशक्तीच्या वतीने मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, १४ एप्रिल रोजी मार्केट यार्ड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील स्मारक परिसरात शासकीय स्वरूपाचा जयंती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मात्र, या कार्यक्रमासाठी करण्यात आलेली व्यवस्था अत्यंत निकृष्ट दर्जाची होती. स्मारक परिसराची रंगरंगोटी व स्वच्छता योग्य पद्धतीने करण्यात आलेली नव्हती. तसेच दरवर्षीप्रमाणे पुतळ्यास पुष्पसजावटही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले. याशिवाय, कार्यक्रमासाठी दरवर्षी हजारो अनुयायी उपस्थित राहत असताना यंदा बैठक व्यवस्थाही अपुरी व विस्कळीत होती. त्यामुळे उपस्थित नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींचा सामना करावा लागला. विशेष म्हणजे, यंदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची रंगरंगोटी देखील करण्यात आलेली नव्हती, ही बाब अधिक खेदजनक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमासाठीचा खर्च महानगरपालिकेकडून केला जात असताना कामाची जबाबदारी नेमकी कोणाला देण्यात आली आणि संबंधितांनी आपले कर्तव्य का पार पाडले नाही, याची सखोल चौकशी करण्यात यावी, तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या वेळी शहर जिल्हाध्यक्ष संजय जगताप, जिल्हा सचिव पोपटराव जाधव, शहर सचिव विशाल भिंगारदिवे, शहर उपाध्यक्ष अभय गायकवाड, अशोक खंडागळे, भाऊसाहेब भिंगारदिवे आदी उपस्थित होते.

# अहिल्यानगरच्या डॉ. हृषिकेश पंडित यांची केनियामध्ये विशेष ‘लॅपरोस्कोपी मॅरेथॉन’

### आंतरराष्ट्रीय स्तरावर जिल्ह्याचा नावलौकिक

नगर – वैद्यकीय क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञानात हातखंडा मिळवत आपल्या अचूक कौशल्याने अहिल्यानगरमधील स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. हृषिकेश पंडित यांनी आंतरराष्ट्रीयस्तरावर जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला आहे. केनियाची राजधानी नैरोबी येथील ’एस्टर हॉस्पिटल’ येथे आयोजित विशेष ’लॅपरोस्कोपी कार्यशाळेमध्ये त्यांना स्त्री रोगावरील गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. यात सहभागी होत डॉ.पंडित यांनी अत्यंत गुंतागुंतीच्या मानल्या जाणाऱ्या अनेक स्त्रीरोग शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडल्या.





नैरोबी येथील प्रा. रफिक पारकर आणि प्रा. जोसेफ वायोईके यांच्या निमंत्रणावरून डॉ. पंडित या कार्यशाळेत सहभागी झाले होते. त्यांनी जटिल शस्त्रक्रिया दुर्बिणी सहाय्याने यशस्वीरित्या केल्या.

एण्डोमेट्रोसीस, फायब्रॉइड्स आणि गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रिया, वंध्यत्व निवारणासाठी उपयुक्त ठरणारी ’फर्टिलिटी–प्रिझर्व्हिंग शस्त्रक्रिया अतिशय कुशलतेने करून डॉ. पंडित यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवला. विशेषतः ज्या रुग्णांवर यापूर्वी ४ वेळा शस्त्रक्रिया होऊनही यश आले नव्हते, अशा अत्यंत गंभीर ग्रेड ४ एण्डोमेट्रीओसीसने त्रस्त महिलेवर डॉ. पंडित यांनी लॅपरोस्कोपीद्वारे यशस्वी शस्त्रक्रिया केली. त्यांच्या या कौशल्याचे तेथील तज्ज्ञांनी विशेष कौतुक केले.

या दौऱ्यामुळे आफ्रिकेतील महिलांना जागतिक दर्जाच्या उपचार पद्धती मिळू शकतात. डॉ. पंडित यांचे अहिल्यानगर मधील कोठी रोड येथील पंडित हॉस्पिटल मध्ये जागतिक दर्जाच्या थ्री डी लेप्रोस्कोपी तंत्रज्ञानाने सुसज्ज सेंटरमध्ये सर्व प्रकारचे स्त्रीरोग उपचार उपलब्ध आहेत. यात वंध्यत्व निवारण आधुनिक उपचार, गर्भाशय, स्तनाचे कॅन्सर निदान व उपचार, दुर्बिणीद्वारे गर्भाशय कॅन्सर शस्त्रक्रिया, दुर्बिणीद्वारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झालेल्या स्त्रियांची गर्भनलिका परत जोडण्याची शस्त्रक्रिया, गर्भाशयाच्या गाठी काढणे, गर्भ नलिकेतील गर्भ दुर्बिणीद्वारे काढणं, हिस्टेरोस्कोपी, अधेसिवोलिसीस, दुर्बिणीद्वारे गर्भाशय काढणे अशा विविध उपचार सुविधा उपलब्ध आहेत. प्रसूती नॉर्मल होण्यासाठी बाळाच्या हृदयाचे ठोके व बाळाची स्थिती दर्शलणारे एन.एस.टी. मशीन, हाय रिस्क प्रेगनन्सी, अद्ययावत सोनोग्राफी मशिन हॉस्पिटलमध्ये आहे. नगरसह परजिल्ह्यातील रूग्ण येथील तंत्रज्ञान युक्त आरोग्य सेवांचा लाभ घेत असतात.

# स्वच्छता नियमांचा भंग तसेच उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर अहिल्यानगर महानगरपालिकेकडून दंडात्मक कारवाई सुरू

### ३ हजार ७०० रुपयांचा आकारला दंड, आयुक्त यशवंत डांगे यांचे नागरिकांना स्वच्छतेचे आवाहन

नगर – शहर स्वच्छ, सुंदर आणि सुस्थितीत ठेवण्यासाठी महापालिकेने स्वच्छता नियमभंग करणाऱ्यांविरोधात कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली आहे.

२२ एप्रिल रोजी शहरातील शहाजी रोड, नवी पेठ, घास गल्ली, तांबटकर गल्ली आणि गांधी मैदान परिसरात स्वच्छता मोहिमे अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे तसेच उघड्यावर लघुशंका करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. एकूण सहा जणांवर यावेळी दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण १७०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच उघड्यावर कचरा जळणाऱ्याकडून दोन हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या निर्देशानुसार ही मोहीम राबविण्यात आली. मुख्य स्वच्छता निरीक्षक पी. व्ही. रामदिन यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता निरीक्षक बाळासाहेब विधाते, प्रसाद बाळू उमाप, प्रशांत चांदणे तसेच मुकादम किशोर वैरागर, अमर वैराळ आणि ओंकार साठे यांच्या पथकाने ही कारवाई केली. आयुक्त डांगे यांनी नागरिकांना शहर स्वच्छतेसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले असून, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे व उघड्यावर लघुशंका करणे, उघड्यावर कचरा जाळणे टाळावे, अन्यथा अशा दंडात्मक कारवाया यापुढे अधिक तीव्र करण्यात येतील, असा इशारा दिला आहे.





### उघड्यावर कचरा जळणाऱ्याला ठोठावला दंड

अहिल्यानगर शहरातील नगर–मनमाड रोडवरील गुरु कार सजावट या दुकानदाराने उघड्यावरच दुकानातील कचरा जाळल्याने महापालिकेच्या पथकाने त्याला २३ एप्रिल रोजी दोन हजार रुपयांचा दंड ठोठावला. कुणी उघड्यावर कचरा जाळताना आढळून आले तर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा आयुक्त डांगे यांनी दिला आहे.

### स्वच्छतेत नागरिकांची साथ महत्त्वाची ;आयुक्त

शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखून सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे टाळावे. कचरा घंटा गाडीतच कचरा टाकावा. स्वच्छता नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे. नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई अधिक तीव्र केली जाईल, असा इशारा महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे.

# खेळाडूंसाठी १० दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन


नगर – जिल्ह्यात खेळाचा प्रचार, प्रसार होऊन खेळाडूंची संख्या वाढविण्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी तसेच शहरी व गावपातळीवर चांगले खेळाडू निर्माण व्हावेत यासाठी ८ ते १४ वयोगटातील व वरिष्ठ गटातील खेळाडूंसाठी १० दिवसांचे प्राथमिक व अद्ययावत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अधिकाधिक खेळाडूंनी या शिबिरामध्ये सहभाग नोंदविण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे.

२८ एप्रिल ते ७ मे या कालावधीत सकाळी ६ ते ८.३० व सायंकाळी ५ ते ७.३० या वेळेत या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. खो–खो या खेळाचे शिबिर बाणेश्वर क्रीडा मंडळ, बुऱ्हाणनगर व आबासाहेब काकडे विद्यालय, निर्मलनगर, शेवगाव येथे होणार आहे. बॅडमिंटन व कुस्ती खेळासाठी जिल्हा क्रीडा संकुल, अहिल्यानगर येथे शिबिर होईल.

जिल्हा क्रीडा प्रशिक्षण योजनेंतर्गत प्राथमिक व अद्ययावत प्रशिक्षण शिबिरात खो–खो, बॅडमिंटन, कुस्ती व कबड्डी या खेळांच्या अधिकाधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवावा. प्रशिक्षण शिबिराच्या अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# श्री दत्त देवस्थानमध्ये श्रीमद् आद्य शंकराचार्य जयंती सोहळा उत्साहात साजरा

नगर – येथील वेदांतनगरमधील श्री दत्त देवस्थानमध्ये प्रथेप्रमाणे श्रीमद् आद्य शंकराचार्य जयंती सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी ९ वाजता श्री दत्तक्षेत्रमधील अधिष्ठानमध्ये गुरूवाणी भाग १९ आणि त्रैमासिक श्रीगुरूसेवाचा प्रकाशन सोहळा कायम विश्वस्त मिलिंद क्षीरसागर यांच्या हस्ते झाला. यावेळी त्रैमासिक श्रीगुरूसेवाच्या संपादिका डॉ.सौ.हेमा जोगळेकर, उत्सव समितीचे अध्यक्ष रमेश जाधव, रोहिणी अय्यर, शशिकला गांगल, मंदाताई जोशी यांच्यासह भाविक उपस्थित होते.





श्री दत्तात्रेय मंदिरात सकाळी १० ते ११ या वेळेत वाजता आद्य शंकराचार्यांच्या मूर्तीवर लघुरुद्र करत वेद सेवा करण्यात आली. दत्त निवासमध्ये सायंकाळी ५ ते ६ या वेळेत शिवलिंगावर लघुरुद्राभिषेक करण्यात आला. वेदमूर्ती राजाराम धर्माधिकारी आणि सहकाऱ्यांनी पौरोहित्य केले. दुपारी ३ वाजता श्री महालक्ष्मी मंडपात श्रीमद् आद्य शंकराचार्य आणि स्तोत्र वाङःमय या विषयावर डॉ.रविंद्र मुळे यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले. श्रीमद् आद्य शंकराचार्यांचे स्तोत्र वाङ् मय सहज, सुबोध आणि नादमधुर आहे. अबालवृद्धांना ते सहज कंठस्थ करून म्हणता येणारे आहे. ज्या भक्ताला मंत्र, यंत्र, आवाहन, ध्यान, मुद्रा, इत्यादी पूजा विधी येत नाहीत अशा भक्ताची आर्त हाक देवांपर्यंत पोहोचविणारे हे वाङ् मय आहे. केवळ संस्कृत आहे म्हणून या स्तोत्रांकडे दुर्लक्ष न करता प्रत्येकाने ते कंठस्थ करण्याचा अवश्य प्रयत्न करावा, असे आवाहन डॉ.रविंद्र मुळे यांनी केले.

वेदान्त विद्यापीठाच्या पाठशाळेतील यशस्वी विद्यार्थ्यांना डॉ.रविंद्र मुळे यांचे हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. विद्यापीठाचे पाठशाळेतील श्रीहरी आघरकर या विद्यार्थ्यांने संपूर्ण घनपाठ परिक्षेत वेदान्त विद्यापीठ आणि श्रृंगेरी शारदापीठ येथे व्दितीय तर कांची कामकोटी येथे प्रथम क्रमांकाचे यश मिळवले. त्याबद्दल त्याचा सन्मान करत कौतुक करण्यात आले. उत्सव समितीचे अध्यक्ष रमेश जाधव यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

विद्यापीठाचे प्रधानाचार्य वेदमूर्ती समिहन कोल्हटकर, अध्यापक अनंत चानसीकर, भानुदास जोशी, निलेश जोशी, शिवानंद माळेगावकर, योगानंद माळेगावकर, गजानन कुलकर्णी यांच्यासह पालक आणि भाविक उपस्थित होते. डॉ.मुळे यांना मिलिंद क्षीरसागर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

सायंकाळी भक्तिपूर्ण वातावरणात पालखी सोहळा पार पडला. पालखी मार्गावर फुलांच्या पायघड्या अंथरण्यात आल्या होत्या. लक्षवेधी विद्युत रोषणाई करण्यात आली होती. पालखी निघाल्यावर वेदसेवा, गायन सेवा आणि फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.

# निरामय

# जादा आइस्क्रीम खाणे धोकादायक

**जपा आरोग्य**

उन्हाळ्याचे चटके जाणवून लागताच लहानग्यांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांची पावले आइस्क्रीमच्या दुकानांकडे वळू लागली आहेत; मात्र आइस्क्रीमपासून मिळणारा गोडवा आणि गारवा अतिप्रमाणात सेवन केल्यास आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरू शकतो.

आइस्क्रीममध्ये साखर, संतृप्त चरबी आणि कृत्रिम रंग यासारख्या घटकांचे प्रमाण जास्त असते. या घटकांमुळे लठ्ठपणा, हृदयरोग, किडणीचे विकार, अपचन, पोट फुगणे तसेच वारंवार सर्दी-खोकल्याच्या समस्या उद्भवतात. धोक्याचे म्हणजे दीर्घकाळात कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढण्याची शक्यता असते. आइस्क्रीम खाताच तोंड आणि घशात तात्पुरता गारवा जाणवतो. त्यामुळे मेंदूला कुलिंग सिग्नल मिळतो; परंतु हा परिणाम तात्पुरता असतो. शरीरात थंड पदार्थ गेल्यानंतर शरीराचे तापमान संतुलित ठेवण्यासाठी शरीर आतून उष्णता निर्माण करण्याचा प्रयत्न करते. अशी प्रक्रिया वारंवार झाल्यास शरीराच्या तापमान नियंत्रण प्रणालीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे थकवा, डिहायड्रेशन आणि उष्णतेचा ताण वाढण्याची शक्यता निर्माण होत आहे.

आइस्क्रीममध्ये साखरेचे प्रमाण जास्त असल्यामुळे हृदयरोग, किडनीचे आजार आणि लठ्ठपणाने ग्रस्त असणाऱ्यांनी त्याचे सेवन टाळावे.

जास्त साखरेमुळे रक्तातील साखरेचे प्रमाण अचानक वाढू शकते. त्यामुळे आधीपासूनच आरोग्याच्या समस्यांनी त्रस्त असलेल्या व्यक्तींना त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते.

आइस्क्रीममधील हे पदार्थ घातक

*साखर – लठ्ठपणा आणि लाहन मुलांमध्ये दाताच्या समस्या

*संतृप्त चरबी – कोलेस्ट्रॉल वाढण्याचा धोका

*कृत्रिम रंग – ॲलर्जी किंवा मुलांमध्ये चिडचिडेपणा

*कृत्रिम फ्लेवर्स – पचनाशीसंबंधित समस्या



# 'चेस्ट इन्फेक्शन'मुळे हृदयविकाराचा धक्का



**दिग्गज गायिका आशा भोसले यांचं मुंबईतील ब्रीच कँडी हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान निधन झालं. हृदयविकाराचा झटका, छातीतील संसर्ग आणि अतिशय थकवा या कारणांमुळे त्यांना आयसीयूमध्ये ठेवण्यात आले होते. मात्र याचवेळी छातीमध्ये झालेल्या इन्फेक्शनमुळे हार्ट अटॅक येऊ शकतो का, असा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण झाला आहे. तज्ज्ञांच्या मते, दोन प्रकारच्या परिस्थितींमध्ये 'कार्डियक अरेस्ट' येऊ शकतो.**


**आरोग्यमंत्र**

आशा भोसले यांना प्रचंड थकवा आणि 'चेस्ट इन्फेक्शन' झाले असल्यामुळे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते आणि नंतर 'कार्डियक अरेस्ट'मुळे त्यांचे निधन झाले. वृद्ध व्यक्तींमध्ये ही दोन्ही स्थिती एकमेकांशी जोडलेली असू शकते. छातीत खूपच काळजी करण्यासारखे इन्फेक्शन झाले असेल, तर शरीरावर आणि खासकरून हृदयावर ताण वाढतो. इन्फेक्शनमुळे शरीरात ऑक्सिजनची कमतरता निर्माण होऊ शकते, तसेच शरीरतील सूज वाढते. या परिस्थितीत हृदयाला जास्त मेहनत घ्यावी लागते. त्यामुळे हृदयाच्या ठोक्यांमध्ये अनियमितता निर्माण होऊ शकते. काही प्रकरणांमध्ये हा ताण इतका वाढतो की अचानक 'कार्डियक अरेस्ट' होण्याचा धोका निर्माण होतो. अशी परिस्थितीत विशेषत: वयस्कर लोकांमध्ये जास्त आढळते. वयोमान वाढल्यावर रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. त्यामुळे ९० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींमध्ये साधे दिसणारे इन्फेक्शनही गंभीर रूप धारण करू शकते. काही वेळा यामुळे सेप्सिससारखी गंभीर अवस्था निर्माण होते. ती थेट हृदयाच्या कार्यावर परिणाम करते. कार्डियक अरेस्टमध्ये हृदय अचानकपणे काम करणे थांबवते. नेहमी हृदयाची धडधड ठराविक लयीत चालू असते; परंतु या अवस्थेत ती पूर्णपणे बिघडते. हे जणू एखाद्या विद्युत शॉर्टसर्किटसारखे घडते. त्यामुळे हृदयाचा पंप क्षणात बंद पडतो. अशा प्रसंगी रुग्णाला लगेच सीपीआर देणं अत्यंत आवश्यक असतं. उपचार १० मिनिटांच्या आत सुरू झाले नाहीत, तर त्याचा जीव वाचवणं फारच अवघड होतं. 'चेस्ट इन्फेक्शन' हा एक सामान्य आजार वाटू शकतो; पण विशेषतः वृद्धांमध्ये तो दुर्लक्षित करणं धोकादायक ठरू शकतं. वेळेवर उपचार, योग्य काळजी आणि लक्षणांकडे दुर्लक्ष न करणं हेच अशा गंभीर परिस्थिती टाळण्याचं प्रमुख साधन आहे.

**कार्डियक अरेस्टची इतर कारणं**

- हृदयाच्या ठोक्यांमधील अनियमितता (विशेषतः वेंट्रिक्युलर फिब्रिलेशन)
- कोरोनरी आर्टरी डिजीज किंवा हार्ट अटॅक
- हृदयाच्या स्नायूंची कमजोरी
- जन्मजात हृदयदोष किंवा वाल्वशी संबंधित समस्या
- शरीरातील इलेक्ट्रोलाइट असंतुलन
- ऑक्सिजनची कमतरता किंवा मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव
- गंभीर संसर्ग किंवा सेप्सिस
- काही औषधांचे दुष्परिणाम, मद्यपान किंवा तीव्र मानसिक-शारीरिक ताण
- ज्यांना आधीपासून उच्च रक्तदाब, मधुमेह, स्थूलता किंवा हृदयाचे आजार आहेत, अशा व्यक्तींमध्ये कार्डियक अरेस्ट होण्याची शक्यता अधिक वाढलेली असते.

# बैठ्या कामामुळे समस्या



**आरोग्य चर्चा**


आजच्या काळात कमी शारीरिक हालचाल आणि सतत बसून राहणे ही आपल्या जीवनशैलीची प्रमुख वैशिष्ट्ये बनली आहेत. यामुळे स्नायू व हाडांशी संबंधित अनेक समस्या उद्भवतात. त्यात पाठदुखी आणि मानदुखीचा समावेश असतो. सध्या बहुतेक कामे व दैनंदिन क्रिया मोबाईल, लॅपटॉप आणि इतर गॅजेट्सवर अवलंबून असल्याने लोक दीर्घकाळ एकाच स्थितीत बसून राहतात. चुकीच्या बसण्याच्या पद्धतीमुळे शरीरावर ताण वाढतो.

आजकाल मानदुखीचे सर्वात मोठे कारण म्हणजे मोबाईल फोनचा अतिवापर. सतत मान खाली वाकवून स्क्रीनकडे पाहिल्याने स्नायू, लिगामेंट्स आणि मणक्यांवर ताण येतो. त्यामुळे वेदना होतात आणि पुढे गंभीर आजार होण्याची शक्यता वाढते. त्याचप्रमाणे, ऑफिसमध्ये काम करणाऱ्या लोकांमध्ये चुकीच्या पद्धतीने लॅपटॉप किंवा संगणक वापरणे हे पाठदुखीचे एक मोठे कारण आहे. योग्य एर्गोनॉमिक्स न पाळल्यामुळे वाकून बसावे लागते. त्यामुळे मणक्यावर अतिरिक्त दाब येतो आणि भविष्यात कंबरदुखीची समस्या वाढू शकते. फक्त पोश्चरच नव्हे, तर जीवनशैलीतील इतर काही सवयीही मणक्यांच्या समस्यांना कारणीभूत ठरतात.

उदाहरणार्थ, शरीरातील वाढलेली चरबी मणक्यावर अतिरिक्त ताण निर्माण करते. तसेच, धूम्रपान केल्याने मणक्यांपर्यंत रक्तपुरवठा कमी होतो. त्यामुळे डिस्क डीजनरेशन होऊ शकते. म्हणजे मणक्यांमधील डिस्क हळूहळू खराब होऊ लागतात.

अचानक खूप जोरदार व्यायाम सुरू करणेदेखील पाठदुखी किंवा इतर स्पाइन समस्यांना कारणीभूत ठरू शकते. व्यायाम हा मणक्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक असला, तरी पूर्णपणे निष्क्रिय जीवनशैलीतून अचानक तीव्र व्यायाम सुरू केल्यास मणक्यावर अतिरिक्त ताण येऊन इजा होऊ शकते. या सर्व धोक्यांपासून बचाव करण्यासाठी संतुलित आणि योग्य पद्धतीने व्यायाम करणे महत्त्वाचे आहे. हळूहळू व्यायामाची सवय लावावी. त्यामुळे शरीर आणि मानेचे स्नायू मजबूत होतात. दररोज चालणे यासारखे सोपे व्यायाम शरीराची हालचाल टिकवून ठेवण्यासाठी उपयुक्त ठरतात. तसेच, दिवसभर योग्य पोश्चर ठेवणे, स्क्रीन वापरताना मध्ये-मध्ये विश्रांती घेणे आणि बसण्याची तसेच उभे राहण्याची पद्धत योग्य ठेवणे आवश्यक आहे.

# ही आहेत किडनी विकाराची लक्षणे



**डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे**

**शरीरातील प्रत्येक अवयव महत्त्वाचा आहे. त्यातही किडनीचे आरोग्य जपणे अत्यंत महत्त्वाचे आहे. किडनी निकामी होणे ही एक गंभीर स्थिती आहे. ही स्थिती उद्भवल्यास किडनी योग्यरित्या काम करण्याची क्षमता गमावते. रक्तातील घाण काढून टाकण्याव्यतिरिक्त पाणी फिल्टर करणे, इलेक्ट्रोलाइट्स बॅलन्स करणे अशी किडनीमार्फत होणारी कामे थांबतात आणि परिस्थिती गंभीर होते.**

**किडनी फेलियरमुळे आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होतात. किडनी निकामी होण्याची काही प्रकरणे आजकाल समोर येताना दिसतात. मात्र किडनी निकामी होण्यापूर्वी शरीर काही संकेत देते. त्याबद्दल जाणून घेऊ या.**



* किडनी निकामी होण्याच्या सुरुवातीच्या लक्षणांपैकी एक म्हणजे अधिक प्रमाणात थकवा येणे. यामध्ये किडनी रक्तातील टॉक्सिन काढून टाकण्यास अपयशी ठरते. त्यामुळे ॲनिमिया होऊ शकतो. परिणामी व्यक्तीला सतत थकवा, अशक्तपणा आणि लक्ष केंद्रित करण्यात अडचण येते.

* अनेकांना रात्री वारंवार उठून लघवी करण्याची सवय असते. अशाप्रकारे रात्री वारंवार लघवी करण्याची गरज वाटत असेल तर हे किडनीच्या समस्येचे लक्षण असू शकते. किडनी योग्यप्रकारे काम करत नाही, तेव्हा शरीरातील द्रव पदार्थ व्यवस्थित फिल्टर होत नाहीत. परिणामी वारंवार लघवीला जावे लागू शकते.

* किडनी फेल झाल्यास शरीरातील पाण्याचे संतुलन बिघडू शकते. त्यामुळे रात्री खूप तहान लागण्याची समस्या उद्भवू शकते. त्यामुळेच रात्री वारंवार पाणी पिण्यासाठी उठावे लागणे हे किडनीच्या समस्येचे लक्षण असू शकते.

* लघवीमध्ये रक्त दिसणे हे किडनीचे इन्फेक्शन, स्टोन किंवा इतर गंभीर समस्यांचे लक्षण असू शकते. म्हणूनच लघवीत रक्त दिसले तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. ही एक गंभीर स्थिती असू शकते हे लक्षात घ्या.

# मूत्रविकाराला निमंत्रण!



**व्याधी विचार**

निरोगी आरोग्यासाठी पाणी पिणे अत्यंत आवश्यक आहे; पण पाणी कधी आणि किती प्यावे, याबाबत अनेक गैरसमज आहेत. खूपदा तहान लागल्यावरच पाणी प्यायले जाते; पण ही सवय किडनीसाठी (मूत्रपिंड) अत्यंत धोकादायक ठरू शकते.

शरीरातील किडनी एक छोटा; पण अत्यंत महत्त्वाचा अवयव आहे. विषारी घटक बाहेर काढणे, रक्ताचे शुद्धीकरण करणे, इलेक्ट्रोलाईट संतुलित राखणे ही कामे किडनी करते. आपण योग्य प्रमाणात पाणी पीत नाही तेव्हा किडनीला ही कार्य करण्यासाठी अधिक मेहनत करावी लागते. यामुळे केवळ थकवाच येत नाही, तर यामुळे किडनी स्टोन (खडा), युरिन इन्फेक्शन आणि 'क्रॉनिक किडनी डिसिज'चा धोका निर्माण होतो.

आपल्याला तहान लागते तेव्हा शरीर आधीच 'डिहायड्रेट' झालेले असते. अशा स्थितीत किडनीवर दबाव वाढलेला असतो. मग आपण तेवढेच पाणी प्यायलो तर ते किडनीचे कार्य सुरळीत करण्यास पुरेसे नसते. अनेक जण पाणी कमी पितात आणि त्याऐवजी चहा, कॉफी किंवा ज्यूस घेतात; मात्र कॅफीन आणि साखरेमुळे शरीरातील पाणी अधिक वेगाने बाहेर काढले जाते. त्यामुळे तात्पुरते फ्रेश वाटणारे पदार्थ घेण्यापेक्षा पाणी पित राहणे आवश्यक असते. काही लोक एकाच वेळी ३ ते ४ लिटर पाणी पितात. यामुळे रक्तातील सोडियमची पातळी अचानक घसरून 'हायपोनेट्रेमिया' नावाची गंभीर स्थिती ओढावू शकते. त्याचा परिणाम मेंदूवर होऊ शकतो. एकाच वेळी खूप पाणी पिणे धोकादायक ठरते. थोड्याथोड्या अंतराने पिणे योग्य ठरते.

आठ ग्लास पाणी हा नियम सर्वांना सारखा लागू होत नाही. साधारणपणे महिलांनी दिवसाला २.२ लिटर द्रवपदार्थ प्यावे. पुरुषांनी दिवसाला तीन लिटर द्रवपदार्थ प्यावे. हवामान, व्यायाम आणि आरोग्याच्या स्थितीवर याचे प्रमाण अवलंबून असते. विशेषतः मधुमेह किंवा हृदयविकार यासारखा कोणताही आजार असलेल्या रुग्णांनी पाण्याचे प्रमाण डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच ठरवावे.

शरीराला पाण्याची किती गरज आहे, हे लघवीच्या रंगावरून ओळखता येते. हलका पिवळा रंग असणे शरीरात पाण्याची पातळी योग्य असल्याचे लक्षण. गडद पिवळा रंग जर असेल तर शरीरात पाण्याची तीव्र कमतरता असल्याचे संकेत. पूर्णपणे पांढरा स्वच्छ रंग दिसत असेल तर गरजेपेक्षा जास्त पाणी प्यायल्याचे लक्षण आहे. किडनीला निरोगी ठेवण्यासाठी दिवसभरात संतुलित प्रमाणात आणि ठराविक अंतराने पाणी पिण्याची सवय लावून घेणे गरजेचे आहे.


# पार्किन्सन्स वेगाने वाढतोय

**व्याधी विकार**

वाढत्या आयुर्मानामुळे देशात पार्किन्सन्स आजाराचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. सध्या सुमारे १२ लाख रुग्ण या आजाराशी झुंज देत आहेत. पुढील दहा वर्षांत ही संख्या दुप्पट होण्याची भीती आहे. पुरुषांमध्ये या आजाराचे प्रमाण दीडपट अधिक असून, ४० वर्षांखालील तरुणांमध्येही आजाराची लक्षणे दिसत आहेत.

पार्किन्सन्स हा मेंदूशी संबंधित आजार असून, तो मन, शरीराच्या हालचाली आणि मेंदूच्या कार्यावर परिणाम करतो. ४० ते ६० वयोगटातील रुग्णांना 'तरुण प्रारंभ पार्किन्सन' तर ४० वर्षांखालीलांना 'किशोर पार्किन्सन' असे संबोधले जाते.

बदलती जीवनशैली आणि वाढत्या आयुर्मानाच्या पार्श्वभूमीवर या आजाराचे बदलते स्वरूप आरोग्य क्षेत्रासाठी मोठे आव्हान ठरत आहे. हा आजार पूर्णपणे बरा होत नसला, तरी योग्य औषधोपचार आणि काळजीमुळे रुग्णांचे जीवनमान सुधारू शकते. काही प्रकरणांमध्ये 'डीप ब्रेन स्टिम्युलेशन' सारख्या शस्त्रक्रियाही उपयुक्त ठरत आहे. पार्किन्सन्सच्या ८ ते १० टक्के प्रकरणांमध्ये अनुवांशिक कारणे आढळतात, तर वायू व प्लास्टिक प्रक्षणासारखे पर्यावरणीय घटकही काही रुग्णांमध्ये कारणीभूत ठरतात. काही औषधांच्या दुष्परिणामांमुळेही पार्किन्सन्ससदृश लक्षणे विकसित होऊ शकतात. लवकर निदान आणि नवीन उपचारपद्धतीमुळे या आजाराचा वेग कमी करणे, नियंत्रित करणे किंवा काही प्रमाणात उलटवणे शक्य आहे. कंपन, हालचालींमध्ये संथपणा, हात-पाय कडक होणे, चालण्यात अडचण, अक्षरात बदल, झोपेचे विकार, चिंता व नैराश्य ही आजाराची प्रमुख लक्षणे आहेत. सुरुवातीला लक्षणे ओळखता येत नसल्याने सुमारे २५ टक्के रुग्णांचे योग्य निदान होत नाही.





जामखेड तालुक्यातील श्री क्षेत्र चौंडी येथे गोदा ते नर्मदा जलयात्रेच्या शुभारंभ करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे. समवेत सभापती प्रा. राम शिंदे, खा. रामराव वडकुते, आ. काशिनाथ दाते, आ. विठ्ठल लंघे, आ. अमोल खताळ, डॉ. सुजय विखे पाटील आदी.

# गोदा ते नर्मदा जलयात्रा देशभर जलसंवर्धनाचा संदेश देईल

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी जलयात्रेचा दिमाखात शुभारंभ

नगर – श्री क्षेत्र चौंडी ही भूमी गेल्या ३०० वर्षांपासून राज्याच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. गोदा ते नर्मदा यात्रेचा हा प्रवास केवळ भौगोलिक नसून तो आध्यात्मिक आणि सांस्कृतिक आहे. आपल्या इतिहासाचा आणि लोकभावनेचा सन्मान करणारी ही जलयात्रा केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण देशभर जलसंवर्धनाचा नवा संदेश देईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

जामखेड तालुक्यातील श्री क्षेत्र चौंडी येथे आयोजित गोदा ते नर्मदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी जलयात्रा २०२६ या जलजागृती यात्रेच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, खासदार रामराव वडकुते, आमदार काशिनाथ दाते, विठ्ठल लंघे, अमोल खताळ, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जलसंपदा सचिव संजय बेलसरे, अधीक्षक अभियंता अलका अहिरराव तसेच पुंडलिक महाराज जंगले शास्त्री, डॉ. विकासानंद महाराज मिसाळ आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी २९ वर्षांच्या आदर्श शासनातून लोककल्याणकारी राज्य कसे असावे, याचा वस्तुपाठ जगाला घालून दिला. जलसंवर्धन, घाटांची निर्मिती आणि शेतकरी हित ही त्यांच्या राज्यकारभाराची वैशिष्ट्ये होती. त्याच पाऊलखुणांवर चालत राज्य सरकार गेल्या चार वर्षांत २२३ जलसिंचन प्रकल्पांना मान्यता देऊन ३२ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी कटिबद्ध आहे.

सभापती प्रा. राम शिंदे यांनी यात्रेचा उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, अहिल्यादेवींच्या कार्याला उजाळा देण्यासाठी जन्मभूमी ते कर्मभूमी या संकल्पनेतून ही यात्रा काढण्यात आली आहे. जलयुक्त शिवार अभियानामुळे २२ हजार गावे टंचाईमुक्त झाली असून, हवामान बदलाच्या काळात पाण्याचा काटकसरीने वापर करणे हीच अहिल्यादेवींना खरी श्रद्धांजली ठरेल.

ही यात्रा चौंडी येथून सीना नदीचे पवित्र जल व मृदा पूजन करून महेश्वरकडे रवाना झाली. २५ एप्रिल रोजी त्र्यंबकेश्वर येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गोदावरीच्या जलकलशाने मुख्य यात्रेचा प्रारंभ झाला. ही यात्रा नाशिक, सिन्नर, संगमनेर, लोणी, शिर्डी आणि अहिल्यानगर असा प्रवास करून दोन्ही यात्रा संभाजीनगरमध्ये एकत्र येतील. २९ एप्रिल रोजी महेश्वर (मध्यप्रदेश) येथे तेथील मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत यात्रेचा समारोप होईल.

# घरपट्टीच्या चुकीच्या सर्वेक्षणामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त, स्थायी समिती, अधिकारी व संस्थेची संयुक्त बैठक घ्यावी



सभापती सुभाष लोंढे

नगर – शहरातील सर्व ओढे व नाल्यांची साफसफाई पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावी. संबंधित नगरसेवकांचे काम पूर्ण झाल्याचे पत्र घ्यावे. शहरातील अंतर्गत गटारी व नाल्यांचीही सफाई पूर्ण करावी, अशा सूचना स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे यांनी महानगरपालिका प्रशासनाला दिल्या. तसेच, घरपट्टीच्या चुकीच्या सर्वेक्षणाचा मुद्दा सभेत पुन्हा समोर आल्याने व या माध्यमातून कर्मचारी नागरिकांशी तडजोडी करत असल्याचे आरोप झाल्यामुळे या विषयावर संयुक्त बैठक आयोजित करण्याचे निर्देशही सभापती सुभाष लोंढे यांनी दिले.

अहिल्यानगर महापालिकेच्या स्थायी समितीची सभा सभापती सुभाष लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यात सभेपुढे ठेवण्यात आलेले सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले. यात शहरातील घरपट्टी सर्वेक्षणाच्या गोंधळावरूनही पडसाद उमटले. एकाच आकाराच्या घरांना वेगवेगळी घरपट्टी लावली जात असून, एजन्सीने जाणीवपूर्वक चुकीची नोंद लावल्याचा मुद्दा निखिल वारे यांनी मांडला. महापालिकेचे कर्मचारी नागरिकांशी तडजोड करून ती बिले कमी करतात, असे सांगत याबाबत संयुक्त बैठक घेण्याची मागणी त्यांनी केली. सभापती सुभाष लोंढे यांनी तत्काळ यावर बैठक लावण्याचे आदेश दिले. ओढे–नाल्यांतील साफसफाईबाबत बोलताना, नगरसेवकांचे पत्र घेऊन जेवढे तास काम होईल तेवढेच बिल मंजूर करावे आणि वैष्णवी कॉलनी व नरहरी नगर परिसरातील ओढ्यांवरील अतिक्रमणे काढून प्रवाह मोकळे करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

दरम्यान, नगरसेवक सुरेश बनसोडे यांनी पावसाचा अंदाज, संभाव्य पाणी कपात आणि शासनाच्या पत्राबाबत माहिती विचारली. यावर प्रभारी जलअभियंता गणेश गाडळकर यांनी माहिती दिली. सध्या धरणाची पाणी पातळी १७८३ असून ती १७५२ पर्यंत राहणे अपेक्षित आहे. त्याबाबत मुळा पाटबंधारे विभागाला पत्र दिले आहे. सध्या एकदिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. त्यामुळे पाणी कपातीचे कोणतेही नियोजन नाही, असे त्यांनी सांगितले. जुलै महिन्यापर्यंत शहरासाठी पाणीसाठा राखीव असतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

# मधुमित्र मधुसखी पुरस्कारासाठी ४ मेपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

नगर – महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत २०२६ सालासाठी मधुमित्र व मधुसखी पुरस्कार योजनेअंतर्गत नामांकन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मधमाशीपालन व्यवसायात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. इच्छुकांनी आपले नामांकन अर्ज ४ मे पर्यंत संबंधित जिल्हा कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत करण्यात आले आहे. मधमाशीपालन क्षेत्रात अनेक वर्षे कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रथम, द्वितीय व तृतीय अशा तीन पुरस्कारांनी गौरविण्यात येणार आहे. त्यापैकी एक पुरस्कार महिलांसाठी राखीव असून, अनुक्रमे ११ हजार, ९ हजार आणि ५ हजार रुपये अशी रोख रक्कम देण्यात येणार आहे.

# महापुरुषांना केवळ नाम घोषापुरते मर्यादा ठेवू नका

## डॉ. मिलिंद कसबे यांचे प्रतिपादन

नगर – महात्मा ज्योतीबा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार वाचून समजून घेणे काळाची गरज आहे. आपल्या महापुरुषांना केवळ श्रद्धेचा विषय बनवू नका किंवा त्यांना केवळ नामघोषात अडकवू नका; तर ते विचार कृतीचा भाग बनवा, असे प्रतिपादन डॉ. मिलिंद कसबे यांनी केले.

अहिल्यानगर येथील सैनिकी कॅम्प मध्ये आयोजित केलेल्या संयुक्त जयंती सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर डॉ. कसबे बोलत होते. ते पुढे म्हणाले की, आपल्या महापुरुषांना जाती–जातीत बंदिस्त केल्याने मोठी संस्कृतिक हानी झाली आहे. महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांनी कोणत्या जातीचा द्वेष केला नाही. मात्र प्रत्येक जातीत असलेल्या दैववादी, अंधश्रध्देला त्यांनी विरोध केला. त्यामुळे त्यांचे कार्य व्यापक होते, असे ते म्हणाले.

पुढे त्यांनी सांगितले की, भारताच्या कृषी धोरणाचा तसेच व्यापार आणि उद्योगाचा पाया महात्मा फुले यांनी रचला आहे. तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भारताच्या वीज, जल आणि कृषि धोरणत फार मोलाचे योगदान आहे. म्हणून या दोन्ही महापुरुषांचे भारताच्या पायाभूत विकासात अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे आहे. तरुणांना मोफत सैनिकी शिक्षणाबद्दल डॉ. आंबेडकरांनी आग्रह धरला होता. त्यांच्या कुटुंबात सैनिकी वारसा होता, त्यामुळे भारताच्या सुरक्षा आणि संरक्षणाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे मूलभूत चिंतन केले आहे. ते आजच्या पिढीने समजून घेतले पाहिजे असे विचार डॉ. कसबे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून व्यक्त केले.



सैनिकी कॅम्प मध्ये आयोजित केलेल्या संयुक्त जयंती सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर डॉ. मिलिंद कसबे बोलत होते.

## अहिल्यानगरच्या सैनिकी कॅम्प मध्ये शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांचा जागर

अहिल्यानगर येथील संरक्षण नियंत्रणालयाच्या व्यतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमांचे अध्यक्ष विभागाचे कंट्रोलर ब्रिगेडियर राजू चावला हे होते. या प्रसंगी भाऊसाहेब गायकवाड यांची यू.पी. एस.सी. मध्ये निवड झाल्याबद्दल विशेष पाहुणे म्हणून सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात गिर्यारोहण प्रेमी व उद्योजक नितीन अवचर व दिलीप गायकवाड, पीपल्स हेल्पलाईनचे प्रकाश थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संयोजन प्रकाश भोसले यांनी केले होते.

# अनुराधा मिश्रा यांची सुवर्ण कामगिरी

## राज्यस्तरीय स्पर्धेत तीन सुवर्ण, 'स्ट्राँग वुमन ऑफ महाराष्ट्र २०२६' किताबाचा बहुमान पटकाविला



नगर – शहरातील अनुराधा रत्नेश मिश्रा यांनी लासलगाव (जि. नाशिक) येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत दमदार कामगिरी करत तीन सुवर्ण पदकांची कमाई केली आहे. पॉवरलिफ्टिंग, बेंच प्रेस आणि डेडलिफ्ट या तिन्ही प्रकारांत त्यांनी अव्वल स्थान पटकावत जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात मानाचा तुरा रोवला आहे.

अनुराधा मिश्रा यांनी यापूर्वीही आशियाई पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय यश मिळवले होते. त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळे आणि जिद्दीमुळे त्यांनी राज्य पातळीवरही आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

या स्पर्धेत बेंच प्रेस प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत अनुराधा मिश्रा यांनी 'स्ट्राँग वुमन ऑफ महाराष्ट्र २०२६' ही मानाची ट्रॉफीही पटकावली. अत्यंत चुरशीच्या आणि काट्याच्या स्पर्धेत त्यांनी तब्बल ३५० किलोपर्यंत वजन उचलत आपले शारीरिक सामर्थ्य आणि तांत्रिक कौशल्य सिद्ध केले. त्यांच्या या कामगिरीने उपस्थित प्रेक्षक आणि क्रीडाप्रेमींना थक्क केले.

या यशामागे त्यांना महाराष्ट्राचे अध्यक्ष तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते तुषार दारकर, सचिव संतोष शिंदे आणि राष्ट्रीय पंच निशा शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच अनुराधा मिश्रा या सावेडी येथील 'जिम स्ट्राईकर'मध्ये प्रशिक्षक स्वप्निल मंडलिक यांच्या देखरेखीखाली नियमित सराव करतात.

# राज्यस्तरीय जाणीव पुरस्कार वितरण सोहळा, संगीत मैफलीचे २६ एप्रिल रोजी आयोजन

नगर – जाणीव सांस्कृतिक अभियानच्या वतीने दरवर्षी प्रदान करण्यात येणारा राज्यस्तरीय जाणीव पुरस्कार वितरण सोहळा २६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता माऊली सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त रसिकांसाठी हिंदी–मराठी गीतांची संगीत मैफल आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून प्रा. सुभाष वारे तर अध्यक्षस्थानी प्राचार्य खासेराव शितोळे असणार आहेत. प्रमुख वक्ते म्हणून एन. बी. धुमाळ आणि अंबिका महिला बँकेच्या संस्थापक मेघाताई काळे उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय सामाजिक कार्य करणाऱ्या निवडक दहा मान्यवरांचा जाणीव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

यंदाचे सत्कारमूर्ती म्हणून शिवश्री जगन्नाथ खंडू चव्हाण, शिवमती रजनी जगन्नाथ चव्हाण, शिवश्री राजेंद्र दादासाहेब कर्डिले, शिवश्री राजेश मुरलीधर मोरे, शिवमती राजश्री रवींद्र शितोळे, डॉ. मनोज कदम, डॉ. संजय वायाळ, स्व. अशोक भांगरे (मरणोत्तर), शिवश्री प्रसाद गुरव आणि डॉ. मुस्ताक शेख यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाच्या पूर्वार्धात सकाळी ११ ते १२.३० या वेळेत रसिकांसाठी हिंदी–मराठी गीतांची संगीत मैफल आयोजित करण्यात आली आहे. या मैफलीत महेश घावटे, निलेश महाजन, विजय आंग्रे, अजय आदमाने, प्रशांत बंडगर आणि मोनाली बोरुडे हे कलाकार आपल्या गायनकलेचे सादरीकरण करणार आहेत.

हा संपूर्ण कार्यक्रम विनामूल्य असून, नगरकर रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दोन्हीही कार्यक्रमांचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन संयोजक शिवाजी नाईकवाडी, प्रा. डॉ. मंजुषा पाटील, इंजिनिअर हेमंत मुळे, गणेश चव्हाण आणि अमोल पाटील यांनी केले आहे.

# तामिळनाडूतील जिंजी किल्ल्यावर भगवा फडकवून महाराष्ट्र दिन साजरा करणार

## 'आपला मावळा'ची १ मे रोजी स्वराज्याच्या तिसऱ्या राजधानीत गडसंवर्धन मोहिम

नगर – सह्याद्रीच्या कुशीत सुरू झालेली गड–किल्ले स्वच्छता आणि संवर्धनाची चळवळ आता राज्याच्या सीमा ओलांडत ऐतिहासिक टप्प्यावर पोहोचली आहे. खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून आपला मावळा या उपक्रमांतर्गत गेल्या वर्षभरात महाराष्ट्रातील विविध गड–किल्ल्यांवर राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्यानंतर आता ही मोहीम थेट तमिळनाडूपर्यंत पोहोचत आहे. महाराष्ट्र दिनानिमित्त (दि. १ मे) तमिळनाडूतील ऐतिहासिक जिंजी किल्ला येथे विशेष स्वच्छता मोहीम आणि भगवा ध्वज फडकावण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

गेल्या वर्षभरात शिवनेरी, धर्मवीरगड, रायरेश्वर, रामशेज, तिकोणा, प्रतापगड, विश्रामगड, भुदरगड, सिंहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, लोहगड यांसारख्या गडांवर शेकडो स्वयंसेवकांच्या सहभागातून स्वच्छता, प्लास्टिक निर्मूलन आणि जनजागृती उपक्रम सातत्याने राबविण्यात आले. गड आपला, जबाबदारी आपली हा संदेश रुजवत या मोहिमेने युवकांना इतिहासाशी जोडण्याचे मोठे कार्य केले. याच चळवळीचा विस्तार म्हणून आता जिंजी किल्ल्यावर हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

तमिळनाडूमधील जिंजी किल्ला हा स्वराज्याच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दक्षिण दिग्विजयानंतर या किल्ल्याला विशेष स्थान प्राप्त झाले, तर पुढे तो स्वराज्याची तिसरी राजधानी म्हणून ओळखला जाऊ लागला. भव्य तटबंदी, डोंगररांगा आणि अभेद्य रचना यामुळे जिंजी किल्ला हा भारतातील सर्वात सुरक्षित किल्ल्यांपैकी एक मानला जातो.







या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र दिनी या किल्ल्यावर स्वच्छता मोहीम राबवून भगवा ध्वज फडकावण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमातून केवळ स्वच्छता नव्हे, तर महाराष्ट्राच्या इतिहासाचा आणि स्वराज्याच्या परंपरेचा अभिमान देशभर पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

या मोहिमेत सहभागी होणारे स्वयंसेवक गड परिसरातील कचरा हटविणे, स्वच्छता राखणे, तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणार आहेत. यासोबतच गडाच्या ऐतिहासिक महत्त्वाबाबत माहिती देत जनजागृती केली जाणार आहे.

महाराष्ट्र दिनानिमित्त या ऐतिहासिक स्थळी भरतनाट्यम, पोवाडा, ढोल–ताशे, मल्लखांब, लाठी–काठी यांसारख्या पारंपरिक कलांचे सादरीकरण करण्यात येणार असून, महाराष्ट्र आणि तामिळनाडू यांच्यातील सांस्कृतिक ऐक्य अधोरेखित केले जाणार आहे.

इतिहासाच्या दृष्टीने जिंजी किल्ल्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दक्षिण मोहिमेनंतर या किल्ल्याचे सामरिक महत्त्व अधिक अधोरेखित झाले. पुढे छत्रपती राजाराम महाराज यांनी औरंगजेबाच्या मुघल सैन्याशी लढा देताना जिंजी किल्ल्यावरून जवळपास ७–८ वर्षे मराठा साम्राज्याची धुरा सांभाळली. त्यामुळे हा किल्ला स्वराज्याच्या जिद्दीचा आणि पराक्रमाचा अजरामर प्रतीक ठरतो.

तसेच, या मोहिमेस तामिळनाडू राज्यातील तंजावर येथील छत्रपतींच्या वंशातील मान्यवर बाबाजी महाराज यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे, ही या उपक्रमाची विशेष गौरवाची बाब आहे. तंजावर हे दक्षिण भारतातील एक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक केंद्र असून, मराठा साम्राज्याच्या प्रभावाखाली येथे मराठा राज्यकर्त्यांनी दीर्घकाळ राज्य केले. विशेषतः व्यंकोजी (एकोजी) राजे भोसले यांनी तंजावरमध्ये मराठा राज्याची स्थापना केली आणि तेथील संस्कृती, कला व प्रशासनावर मराठ्यांचा ठसा उमटवला.

जिंजी किल्ल्यासारख्या ऐतिहासिक वारसा स्थळांच्या संवर्धनासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या युनेस्कोच्या वारसा जतन संकल्पनेशी सुसंगत असा हा उपक्रम असून, वारसा संवर्धनाची जागतिक जाणीव निर्माण करण्याचा देखील यामागे उद्देश आहे.

आपला मावळाच्या माध्यमातून सुरू झालेली ही चळवळ आता एक व्यापक लोकचळवळ बनत असून, राज्याच्या सीमा ओलांडून देशपातळीवर पोहोचत आहे. महाराष्ट्र दिनी जिंजी किल्ल्यावर होणारा हा उपक्रम गडसंवर्धनाच्या चळवळीला नवी दिशा देणारा ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

या पत्रकार परिषदेसाठी खा.निलेश लंके, आपला मावळा संघटनेचे अध्यक्ष रामेश्वर निमसे, उपाध्यक्ष नगरसेवक योगीराज गाडे, प्रा. सीताराम काकडे, आदित्य जीवनगोरे (धाराशिव), अविनाश बानकर, जीशान शेख (सोलापूर) आदी उपस्थित होते.

# जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीला ८ कोटी ५० लाखांचा ढोबळ नफा



चेअरमन संजय कडूस

नगर – अहिल्यानगर जिल्हापरिषद कर्मचारी सोसायटीला सन २०२५ – २०२६ या आर्थिक वर्षामध्ये ८ कोटी ५० लाख रुपयांचा ढोबळ नफा झालेला असून आवश्यक त्या तरतुदी रक्कम रुपये ४ कोटी ४० लाख रुपये वजा जाता संस्थेस ४ कोटी १० लाख निव्वळ नफा झालेला असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन संजय कडूस यांनी दिली. तसेच या नफ्यातून सभासदांना १२ टक्के लाभांश देण्याची शिफारस संचालक मंडळाने केली असल्याचे त्यांनी सांगितले.

याबाबत अधिक माहिती देताना चेअरमन कडूस यांनी सांगितले की, मार्च २०२६ अखेर संस्थेची सभासद संख्या २७२६ असून संस्थेचे वसूल भाग भांडवल २७ कोटी १७ लाख, फंड्स २० कोटी ७२ लाख, ठेवी १९४ कोटी ८० लाख, सभासदांना कर्ज वाटप १७९ कोटी ४८ लाख असून अहवाल सालात सभासद कल्याण निधी मधून विवाह भेट योजने अंतर्गत ५८ सभासदांच्या पाल्यास संस्थेने धनादेशाव्दारे प्रत्येकी ५ हजार रुपये विवाह भेट योजनेचा लाभ देण्यात आहे. त्यासाठी एकूण २ लाख ९० हजार रुपयांचे वाटप करण्यात आले. तसेच सभासद कुटूंब आधार विमा योजने अंतर्गत २ मयत सभासदांचे कायदेशीर वारसास रुपये १५ लाख प्रमाणे एकूण ३० लाख रुपये लाभ देण्यात आला. २ मयत सभासदांच्या वारसांना १० लाख प्रमाणे एकूण २० लाख रुपये अपघात विमा पॉलीसीचा लाभ देण्यात आला. संस्थेच्या सभासदांसाठी सन २०२६–२०२७ या साला करीताही १० लाखाची अपघात विमा पॉलीसी घेतलेली आहे. सभासद कर्ज मर्यादा २० लाख असून सभासदांच्या मुदत ठेवीवर ८ टक्के व्याजदर दिल्यामुळे संस्थेच्या ठेवीत वाढ होऊन कॅश क्रेडीट कमी झालेले आहे. तसेच सभासदांच्या कायम ठेवीवर ९ टक्के व्याज दिले आहे. तसेच कर्जावरील व्याजदर ९ टक्के आहे. संचालकांनी खर्चात काटकसर करून आणि आवश्यक त्या तरतुदी करून सभासदांना १२ टक्के लाभांश देण्याची शिफारस केली असल्याचे चेअरमन कडूस यांनी सांगितले.

## ७ जून ला वार्षिक सर्वसाधारण सभा

संचालक मंडळाच्या मासिक बैठकीत झालेल्या चर्चेअंती संस्थेची ९९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ७ जून २०२६ रोजी घेण्याचा मानस असल्याचे व्हाईस चेअरमन अर्जुन मंडलिक यांनी सांगितले. मागील वर्षाप्रमाणे लाभांश व व्याजाची रक्कम सभेच्या दुसऱ्या दिवशी सभासदांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येणार आहे. या वार्षिक सभेत सभासदांच्या विशेष गुणवत्ता प्राप्त मुला–मुलीना पारितोषिक, सन्मान चिन्ह देवून गौरविण्यात येणार असून यासाठी सभासदांनी पारितोषिकासाठी आपल्या गुणवंत पाल्यांची नावे १५ मे २०२६ पर्यंत जमा करावेत असे आवाहन त्यांनी केले आहे.

सदर प्रसंगी संस्थेचे संचालक प्रशांत मोरे, विक्रम ससे, विलास शेळके, अरुण जोर्वेकर, भाऊसाहेब चांदणे, राजू दिघे, दिलीप डांगे, चंद्रकांत संसारे, ऋषिकेश बनकर, स्वप्नील शिंदे, श्रीमती ज्योती पवार, कल्याण मुटकुळे, सुधीर खेडकर, श्रीकांत देशमाने, काशिनाथ नरोडे, कैलास डावरे, योगेंद्र पालवे, श्रीमती सुरेखा महारनूर, श्रीमती मनिषा साळवे, अभिजित पवार, चेतन चव्हाण, व्यवस्थापक राजेंद्र पवार, उप व्यवस्थापक प्रशांत लोखंडे व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

